## महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग - दोन

## गुरुवार, दिनांक २० ऑगस्ट, २०२६ / श्रावण २९, १९४८ (शके)

१३१. **लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण :-**

विधानसभेचे सन २०२६ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन बुधवार, दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात एकूण ३६१ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. ३६१ निवेदनांपैकी २४७ निवेदने मा. सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आलेली होती. ११४ निवेदनांपैकी ३८ निवेदने सोमवार, दिनांक ८ जून, २०२६ रोजीच्या पत्रक भाग-दोन क्रमांक ८५ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. ७६ निवेदनांपैकी आता १७ निवेदने कक्षात प्राप्त झाली असून ती या सोबत वितरीत करण्यात येत आहेत. उर्वरित प्रलंबित ५९ निवेदनांचा संबंधित मंत्रालयीन विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

तसेच एम.के.सी.एल. तर्फे विकसित करण्यात आलेल्या MOIS या संगणकीय प्रणालीद्वारे सन्मा. विधानसभा सदस्यांनी संपूर्णतः ऑनलाईन (Online) पध्दतीने लक्षवेधी सूचना दिलेल्या असल्यामुळे विधानसभा सदस्यांना ऑनलाईन (Online) पध्दतीने निवेदने प्राप्त होणार असून उर्वरित प्रलंबित निवेदने प्राप्त झाल्यानंतर सर्व विधानसभा सदस्यांना पत्रक भाग-२ द्वारे अवगत करण्यात येईल.

**विधान भवन,**
**मुंबई**
**दिनांक : २० ऑगस्ट, २०२६**

**मेघना तळेकर**
**सचिव-२,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :-**

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य
२) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
३) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
५) सचिव-२, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
६) सचिव-३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
७) सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष

९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये

१०) संगणक कक्ष

११) एम.के.सी.एल.

१२) अनुवाद कक्ष

१३) प्रतिवेदन कक्ष

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२६ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**

**श्री. रवी राणा, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना (क्रमांक : १२१४) खालील प्रमाणे :-**

"अमरावती जिल्ह्यातील सासन रामापूर ता. दर्यापूर या ग्रामीण भागात वीज वितरण कंपनीचे काही विद्युत पोल अत्यंत जीर्ण व धोकादायक अवस्थेत उभे असून ते कधीही कोसळण्याची शक्यता असणे, त्यामुळे स्थानिक नागरिकांच्या जीवितास व मालमत्तेस गंभीर धोका निर्माण झाला असणे, विशेषतः वादळी पावसाळ्यात अपघात होण्याची भीती अधिक तीव्र झाली असणे, या संदर्भात लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०४/०७/२०२५ रोजी पत्राद्वारे मा. महसूल मंत्री तथा पालकमंत्री, अमरावती जिल्हा तसेच मुख्यअभियंता व अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, अमरावती यांचेकडे लेखी मागणी केली असणे, त्यानंतर जिल्हा नियोजन अधिकारी, अमरावती यांनी दि. २५/०७/२०२५ रोजी अधीक्षक अभियंत्यांना पत्र पाठवून धोकादायक पोल काढणे किंवा त्या ठिकाणी विद्युत वाहिनी बेंच केबल टाकण्याचेसाठी निर्देश दिले असणे, मात्र सदर बाब तातडीची असतानाही अद्याप ते काम पूर्ण झालेले नसणे, हे काम पूर्ण होण्यासाठी शासनाने तात्काळ दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**मा.मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन**

अमरावती जिल्ह्यातील सासन रामापूर, ता. दर्यापूर या ठिकाणी लघुदाब वीज वाहिनीचे रुपांतर एरीयल बंच केबलेव्दारे करण्याचे काम, जिल्हा सर्वसाधारण योजना-पध्दती सुधारणा अंतर्गत मंजूर करण्यात आले. सदर कामाचे अंदाजपत्रकास दि. २४.०३.२०२६ रोजी जिल्हा नियोजन समितीकडून प्रशासकिय मान्यता प्राप्त झाली व त्यानुसार उक्त काम मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणे पूर्ण करण्यात आलेले आहे.

**********

Rota H 0128 750 (6/26)

# महाराष्ट्र विधानसभा

सन २०२६ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री.चंद्रकांत सोनवणे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना (क्रमांक- २३०८) खालीलप्रमाणे :-

"जळगांव जिल्ह्यातील चोपडा मतदार संघ हा आदिवासी बहूल येथील दुर्गम, अतिदुर्गम भागातील १४ गावे व २५ पाड्यांना सुरळीत व नियमित वीज पुरवठा करता यावा याकरीता मौजे कर्जाने, ता.चोपडा येथे दि.१७ मार्च, २०१२ रोजी ३३ के.व्ही. उपकेंद्र मंजूर करण्यात येणे, सदर उपकेंद्राचे बांधकाम २०१३ मध्ये पूर्ण होणे, तथापि अद्याप विद्युत वाहिन्यांचे काम अपूर्णावस्थे असणे, उपकेंद्राच्या विद्युत तारा या वन विभागाच्या हद्दीतून जात असल्यामुळे वन विभागाची परवानगी गरजेचे असणे, परंतु वन विभागाने एन.पी.व्ही.ची रक्कम भरणा न केल्यामुळे विद्युत तारा टाकण्यास परवानगी नाकारणे, एन.पी.व्ही.पोटी १५.४६ कोटी रुपये वने विभागाला देणे प्रलंबित असणे, गेल्या १३ वर्षापासून सदर प्रकल्पाचे काम अर्धवट अवस्थेत असल्याने आदिवासी बांधवांना विजेपासून वंचित रहावे लागणे, त्यामुळे त्यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष, मुख्य अभियंता, महावितरण, प्रतापगड यांनी एन.पी.व्ही.ची रक्कम देण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यासाठीचा प्रस्ताव सह सचिव, उर्जा विभाग यांचेकडे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये सादर केलेला असणे, तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींकडून गेल्या १० वर्षापासून सदर प्रकरणी पाठपुरावा करण्यात येणे, शासनाने सदर प्रकरणी तातडीने कार्यवाही करुन उक्त प्रस्तावास मंजूरी देऊन कर्जाने, ता.चोपडा येथील ३३ के.व्ही.उपकेंद्र त्वरीत कार्यान्वीत करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

## मा.मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

जळगाव जिल्ह्यातील चोपडा मतदार संघ हा आदिवासी बहुल दुर्गम, अतिदुर्गम भाग असून तेथे १४ गावे व २५ पाड्यांना ३३/११ के.व्ही. विरवाडे उपकेंद्र येथून ११ के.व्ही. मालापूर ट्रायबल फिडरद्वारे वीजपुरवठा केला जातो. या परिसराची एकूण लोकसंख्या अंदाजे १०,०३२ असून त्यापैकी सुमारे ३,००० आदिवासी कुटुंबे आहेत.

सदर भागातील विद्युत यंत्रणेचे सक्षमीकरण करण्याकरिता मौजे कर्जाणे येथे नवीन ३३/११ के.व्ही.उपकेंद्र प्रस्तावित करण्यात आले. ह्या उपकेंद्राच्या कामास आदिवासी विकास विभाग शासन निर्णय दि. १७.०३.२०१२ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदर कामाकरिता आदिवासी विभागामार्फत रु.२२४.१२ लक्ष इतका निधी दि.२७.०७.२०१२ रोजी महावितरण कंपनीस प्राप्त झाला. त्यानंतर, निविदा प्रक्रिया पूर्ण करून कंत्राटदार मे. लक्ष्मी इलेक्ट्रिकल्स, नाशिक यांना दि.११.१०.२०१३ रोजी कार्यादेश देण्यात आला आहे. सदर कार्यादेशानुसार फक्त उपकेंद्र उभारणीचे काम २०१३-१४ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. परंतु वन विभागाच्या परवानगी अभावी ३३ व ११ केव्ही वाहिनीचे काम प्रलंबित आहे. उपकेंद्र यार्ड अंतर्गत भागातील काम पूर्ण झाले असून ५ एमव्हीए क्षमतेचा पॉवर ट्रान्सफॉर्मर स्थापित करण्यात आला आहे. सदर ट्रान्सफॉर्मर एक (single) फेज वीजपुरवठ्याद्वारे Humming स्थितीत ठेवण्यात आलेला आहे. वीजवाहिनीच्या कामांची तसेच अन्य तांत्रिक बाबींची

पूर्तता झाल्यावर उपकेंद्र कार्यान्वित करता येऊ शकेल. उपकेंद्र यार्डाचे काम पूर्ण करण्यासाठी १८१.०० लक्ष खर्च करण्यात आला. उर्वरित रु ४३.२२ लक्ष निधी शिल्लक आहे.

मूळ प्रशासकीय मान्यतेमध्ये प्रस्तावित तांत्रिक कामे समाविष्ट होती. तथापि, वन विभागाची परवानगी मिळविण्यासाठी आवश्यक असलेला खर्च सदर प्रशासकीय मान्यतेमध्ये समाविष्ट नव्हता.

उपकेंद्र दीर्घ कालावधीपासून कार्यान्वित नसल्यामुळे सध्या उपकेंद्रातील काही उपकरणे, जसे की ३३ केव्ही लाईटनिंग अरेस्टर्स (LA), पॅनेलमधील वायरिंग, केबल ॲक्सेसरीज तसेच डी. सी. बॅटरी संच यांचे नूतनीकरण अथवा पुनर्स्थापना आवश्यक आहे. तसेच ब्रेकर पॅनेल व पॉवर ट्रान्सफॉर्मरची चाचणी व सर्व्हिसिंग करून उपकेंद्र कार्यान्वित करण्यासाठी उपरोक्त तांत्रिक कामे करणे आवश्यक आहे.

प्रस्तावित उर्वरित सर्व कामे ही कर्जाने उपकेंद्राशी थेट संबंधित असून उपकेंद्र कार्यान्वित करण्यासाठी ती आवश्यक आहेत. विशेषतः प्रस्तावित ३३ व ११ केव्ही या वीजवाहिनीचे काम आणि वन विभागाची परवानगी ही विद्यमान उपकेंद्राच्या कार्यान्वित करण्यासाठी अपरिहार्य बाब आहे.

सदर उपकेंद्रास महापारेषणच्या १३२/३३ केव्ही चोपडा उपकेंद्रातून निर्गमित होणाऱ्या ३३ केव्ही मामलदा वाहिनीला जोडून (tapping) वीज पुरवठा करणे प्रस्तावित आहे. या ३३ केव्ही वाहिनीची एकूण लांबी २५ किमी असून त्यापैकी १५.०४ किमी वाहिनी हि अत्यंत घनदाट वनक्षेत्रातून जात असल्यामुळे त्यासाठी वनविभागाची परवानगी आवश्यक आहे, त्यासाठी उपवनसंरक्षक, यावल वनविभाग यांचेकडे दि.०४.०४.२०१५ रोजी परवानगी मागण्यात आली. त्यान्वये वनविभागाकडून प्रारंभी रु. २.५५ कोटी इतक्या रकमेची डिमांड नोट देण्यात आली होती. सदर रकमेवर सूट मिळावी व कामाची परवानगी प्राप्त व्हावी याकरिता महावितरणमार्फत वनविभागास दि.१६.१२.२०१५ रोजी विनंती करण्यात आली होती, तथापी संबंधित सूट मंजूर होऊ शकली नाही. त्यामुळे ३३ केव्ही वाहिनीच्या उभारणीचे काम हे प्रलंबित आहे.

त्यानंतर वन विभागाकडून दिनांक १०.१०.२०२५ च्या पत्रान्वये सुधारित दरानुसार रु. ११.०४४ कोटी इतक्या रकमेची मागणी प्राप्त झाली आहे. सदर मागणीपत्राचे पुनर्विलोकन करण्यात यावे याकरिता उपवनसंरक्षक, यावल वनविभाग यांना दिनांक १४.१०.२०२५ च्या पत्रान्वये विनंती करण्यात आलेली आहे. दरम्यान, वनविभागाने मागणी केलेली रु. ११.०४४ कोटी इतकी रक्कम व उपकेंद्राचे उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक रु. ४.४२ कोटी असे एकूण रु.१५.४६५ कोटी इतका निधी महावितरण कंपनीस उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
वन विभागाची अंतिम परवानगी प्राप्त होताच उपकेंद्रास वीजपुरवठा करणाऱ्या ३३ व ११ केव्ही वीजवाहिनीचे काम पूर्ण होऊन उपकेंद्र कार्यान्वित होऊ शकेल.

सद्यस्थितीत प्रकल्पातील उपकेंद्र व संबंधित कामे पूर्ण झाली असून वन विभागाची अंतिम परवानगी, आवश्यक निधीची उपलब्धता तसेच उर्वरित तांत्रिक कामांची पूर्तता झाल्यानंतर कर्जाने उपकेंद्र कार्यान्वित करणे शक्य होईल. उपकेंद्र कार्यान्वित झाल्यानंतर कर्जाणे परिसरातील आदिवासी गावे व वसाहतींना अधिक गुणवत्तापूर्ण, विश्वासार्ह व अखंडित वीजपुरवठा उपलब्ध होण्यास मोठी मदत होईल. महावितरणकडून प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी आवश्यक कार्यवाही व समन्वय सातत्याने करण्यात येत आहे.

***********************************

**नगर विकास विभाग** **लक्षवेधी सूचना क्र. २२७७**

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२६ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन**

**श्री. प्रतापराव गोविंदराव पाटील चिखलीकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२२७७ पुढीलप्रमाणे आहे :-**

"महाराष्ट्राची राज्याची सांस्कृतिक राजधानी,शिक्षणाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे महानगरपालिकेच्या अनेक विभागांमध्ये माहे जानेवारी ते डिसेंबर, २०२५ या कालावधीत कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येणे, यामध्ये प्रामुख्याने शहरातील कचरा न उचलता लाखो रुपयांची बोगस बिले अदा करण्यांत येणे, पुणे शहरात अनेक ठिकाणी कचऱ्यांचे ढिग साचणे, याचा नागरिकांना नाहक प्रचंड त्रास सहन करावा लागत असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, यावर महानगरपालिका आयुक्तांचे कोणतेही नियंत्रण नसणे, कचरा घोटाळा पाठोपाठ शहरात अनेक ठिकाणी रस्त्यात खड्डे पडलेले असून दुरुस्तीच्या नावावर लाखो रुपयांची बोगस बिले उचलली जात असणे, तसेंच ड्रेनेज लाईन अनेक दुरुस्ती न करतां खोटी देयके तयार करुन मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाला असल्याचे दिसून येणे, शहरात अनेक ठिकाणी महानगरपालिकाचे विद्युत खांब, लाईट बसविण्यात येत नसणे, त्यामुळे जनता महानगरपालिकेच्या संपूर्ण कारभाराला कंटाळली असणे, यासर्व बाबींस पुणे महानगरपालिकेचे आयुक्त व अतिरिक्त आयुक्त हे कारणीभूत असणे, त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची चौकशी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**<u>मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन</u>**

पुणे महानगरपालिका क्षेत्रातील मलनिस्सारण व्यवस्था सुरळीत राखण्यासाठी मलनिस्सारण देखभाल व दुरुस्ती विभागामार्फत ड्रेनेज लाईनची नियमित देखभाल, दुरुस्ती तसेच तातडीची कामे आवश्यकतेनुसार करण्यात येतात. नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारी तसेच ऑनलाईन PMC Care प्रणालीवर नोंद होणाऱ्या तक्रारींची संबंधित क्षेत्रीय कार्यालयातील अभियंता व कर्मचारी यांच्यामार्फत प्रत्यक्ष पडताळणी करुन त्यांचे वेळेत निराकरण करण्यात येते.

सदर कामे प्रचलित नियम, अधिनियम व प्रशासकीय कार्यपद्धतीनुसार करण्यात येत असून प्रत्येक कामाची नोंद, प्रत्यक्ष पाहणी व संबंधित अधिकाऱ्यांच्या प्रमाणानंतरच देयके मंजूर करण्यात येतात. त्यामुळे मलनिस्सारण देखभाल व दुरुस्ती विभागामध्ये ड्रेनेज लाईनची दुरुस्ती न करता खोटी देयके काढून भ्रष्टाचार झाल्याचा आरोप वस्तुस्थितीस अनुसरुन नाही.

रस्त्यावरील खड्डेदुरुस्तीबाबत पावसाळ्यापूर्वी भरारी पथक स्थापन करून पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील अस्तित्वातील खड्ड्यांचे सर्वेक्षण करुन त्यानुसार खड्डे बुजवण्याचे काम

शास्त्रशुद्ध पद्धतीने करण्यात येते. तसेच, पूर्ण महानगरपालिकेतर्फे रोडमित्र ॲप द्वारे नागरिकांना खड्ड्यांची तक्रार ऑनलाइन पद्धतीने करण्याची सुविधा यापूर्वी उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यानुसार प्राप्त तक्रारींचे निराकरण ७२ तासांत केले जाते.

त्यानुसार रोडमित्र ॲप द्वारे आत्तापर्यंत सुमारे ४,४७१ खड्ड्यांच्या तक्रारीचे निरसन करण्यात आले आहे. तसेच PMC CARE व इतर ऑनलाइन ॲपवर प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने वेळोवेळी खड्डे दुरुस्ती करण्यात येते. तसेच पुणे मनपाचा पथ विभागामार्फत RMV (Road Maintainance Vehicle) द्वारे दरवर्षी २४ x ७ पद्धतीने खड्डे / रस्ते देखभाल दुरुतीचे काम अविरत करण्यात येते. पुणे मनपातर्फे शास्त्रशुद्ध पद्धतीने खड्डे बुजवून त्याचे रीतसर देयके अदा केली जातात.

पुणे मनपातर्फे, पुणे शहर खड्डेमुक्त अभियान दि.०३/११/२०२५ पासून सुरु केले असून त्यामध्ये सुमारे १७,३५८ खड्डे बुजविले आहेत व सुमारे ९३,२७४ चौ. मी. चे पॅचवर्क करण्यात आले असून सदर अभियान यापुढे देखील सुरु ठेवण्यात येत आहे.

तसेच, पुणे मनपातर्फे RAMS (Road Asset Management System) च्या माध्यमातून GIS द्वारे रस्त्यांची माहिती, नकाशे दरवर्षी अद्यायावत केले जातात. त्यानुसार खराब रस्त्यांची दुरुस्तीची कामे करण्यात येतात. तसेच, Trenching Portal द्वारे रस्ते खोदाईसाठी ऑनलाइन पद्धतीने परवानगी देण्याची सुविधा उपलब्ध करण्याचे नियोजन आहे.

पुणे महानगरपालिकेच्या संपूर्ण हद्दीमध्ये एकूण स्ट्रीट लाईट पोल मुमारे १,७०,६०३ इतके असून स्ट्रीट लाईट फिटिंग्ज सुमारे २,१३,२५४ इतकी आहेत. सदर स्ट्रीट लाईटची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती क्षेत्रीय कार्यालय स्तरावर करण्यात येत असते.

विद्युत विभागामार्फत नव्याने समाविष्ट ३२ गावांमध्ये, ज्या ठिकाणी प्रकाश व्यवस्था उपलब्ध नव्हती अशा ठिकाणी सन २०२३-२४ ते सन २०२५-२६ या तीन वर्षात अंदाजे ६९५७ एफ.आर.पी. (Fiber Reinforced Polymer) पोल उभारून प्रकाश व्यवस्था करण्यात आली आहे.

माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये ११ गावे व माहे जून, २०२१ पासून पुणे महापालिकेच्या कार्यक्षेत्रात नव्याने गावे समाविष्ट झाल्याने सद्यस्थितीत २०२६ मध्ये पुणे शहरात दैनंदिन कचरा निर्मिती २७०० ते २८०० मे. टन पर्यंत होत आहे. माहे जानेवारी, २०२० पासून पुणे शहरात निर्माण होणाऱ्या संपूर्ण कचऱ्यावर प्रक्रिया करून विल्हेवाट लावण्यात येत असून कोणताही कचरा ओपन डम्पिंग करण्यात येत नाही.

पुणे शहरात दैनंदिन निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्यापैकी ३०० मे. टन कचऱ्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करण्याकरिता CBG (Compressed Bio Gas) प्रकल्प उभारण्याचे नियोजित असून स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत महाराष्ट्र शासनास प्रकल्प अहवाल (DPR) मान्यतेस्तव सादर केला असता महाराष्ट्र शासनामार्फत प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली असून घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

पुणे महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या निविदा वर्तमानपत्रात जाहिरात देऊन ऑनलाईन पद्धतीने महा टेंडर पोर्टलद्वारे मागविण्यात येतात व या निविदेमध्ये किमान दर देणाऱ्या

ठेकेदाराची निविदेची सक्षम अधिकारी यांची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येत असते. त्यामुळे सदर निविदांमध्ये अनियमितता होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या तंत्रज्ञान विकासाचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमधील घनकचरा संकलन व वाहतुक करिता कंत्राटी पद्धतीने घेण्यात येणाऱ्या वाहकास मासिक देयके ही सदर वाहनांद्वारे झालेले प्रत्यक्ष कामकाज, कचरा हस्तांतरण केंद्र व कचरा प्रक्रिया प्रकल्प येथील नोंद क्षेत्रीय कार्यालयाकडील अहवाल वाहनांचे जीपीएस रिपोर्ट याची खातरजमा करुन मान्य निविदा दराने अदा केली जात आहेत.

शहरातील कचऱ्याचे क्रॉनिक स्पॉटचे निरसन करणे, अधिक कार्यक्षम व परिणामकारक कचऱ्याचे संकलन व वाहतुक करणेकामी पुणे मनपा मार्फत प्राथमिक घनकचरा संकलन व वाहतुकी करिता पाच वर्षामाठी वाहने भाडेतत्वावर घेणेकामी नव्याने मागविण्यात आलेल्या निविदे अंतर्गत ३४० छोट्या घंटागाड्या, ११ रिफ्यूज कलेक्टर आणि १२ कॉम्पॅक्टर बाहेर पुढील २ ते ३ महिन्यात समाविष्ट करण्यात येणार आहेत. यामुळे ही कचरा उठाव कार्यक्षमतेने होण्यास मदत होणार आहे.

केंद्र सरकारने मे.आदर पूनावाल क्लीन सिटी इनिशिएटिव्ह (APCCI) यांची स्वच्छता दूत म्हणून नेमणूक केली असून APCCI यांच्याकडूनही सीएसआर अंतर्गत पुणे शहरात घनकचरा संकलन व वाहतुकीकरीता ग्लुटॉन मशीन, छोटी ट्रिलो, मोठी ट्रिलो, मिनी कॉम्पॅक्टर अशी एकूण 192 वाहने पुरविण्यात येत आहेत. त्यामळे दैनंदिन घनकचरा संकलनास मदत होत आहे. पुणे मनपामार्फत व स्वच्छ सेवा सहकारी संस्थेमार्फत अधिकाधिक भागातील कचरा संकलन करण्याबाबत नियोजन करण्यात येत असून याबाबत नियमित आढावा घेण्यात येत आहे. स्वच्छ संस्थेमार्फत वस्ती पातळीवरील अरुंद ठिकाणी दारोदारी जाऊन कचरा संकलन करण्यात येत आहे. सदर कचरा संकलना करीता स्वच्छ संस्था व पुणे मनपा सेवकांमार्फत ३५४२ ढकली गाडयांचा वापर करण्यात येत आहे.

शासनाच्या दि.३०/०६/२०२१ रोजीच्या अधिसूचनेनुसार पुणे शहराच्या नजीकच्या २३ गावांचा पुणे महानगरपालिकेत समावेश झालेला आहे. सदर समाविष्ट गावांपैकी एकही गावामध्ये कचरा प्रकल्प कार्यरत नव्हता त्यामुळे इतर गावातील सुमारे २५० ते ३०० मे. टन इतक्या अतिरिक्त कचऱ्याचा भार पुणे महानगरपालिकेवर पडलेला असून सदरचा संपूर्ण कचरा पुणे महानगरपालिकेच्या कचरा प्रक्रिया प्रकल्पामध्ये प्रक्रियेसाठी घेण्यात येत आहे. नगर विकास विभागाच्या दिनांक ११ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णया नुसार उरुळी देवाची व फुरसुंगी या दोन गावांची स्वतंत्र नगरपरिषद स्थापन करण्यात आलेली आहे. तथापि, दि. २३/०१/२०२८ रोजीच्या शासन निर्णया नुसार सदर दोन्ही गावांचा सुमारे ८५ ते ९० मे. टन कचरा सद्यस्थितीत पुणे महानगरपालिकेमार्फत संकलन, वाहतूक व प्रक्रिया करण्यात येत आहे.

भारत सरकार द्वारे स्वच्छ भारत अभियान अंतर्गत घेण्यात येणाऱ्या स्वच्छ सर्वेक्षण २०२४ मध्ये पुणे शहराचा १० लक्ष वरील लोकसंख्येच्या शहरामध्ये देश पातळीवर ८ वा क्रमांक व राज्य क्रमांक २ असून, Garbage Free City ५ स्टार रेटिंग व Water+ प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे. तसेच Best 'Self Sustainable Big City' या संवर्गात प्रथम पारितोषक पुणे शहरास मिळाले आहे. पर्यटन, पर्यावरण व

वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या मार्फत राबविण्यात येणाऱ्या माझी वसुंधरा अभियानात पुणे शहरास उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले आहे. माहे जानेवारी, २०२० पासून पुणे शहरात निर्माण होणाऱ्या संपूर्ण कचऱ्यावर प्रक्रिया करून विल्हेवाट लावण्यात येत असून शहरात कचरा ओपन डम्पिंग करण्यात येत नाही.

*******

**नगर विकास विभाग** **लक्षवेधी सूचना क्र. २५२२**

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२६ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**श्री. विक्रम बबनराव पाचपुते, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२५२२ पुढीलप्रमाणे आहे :-**

"शासन निर्णय पीएमसी (RR)-३०१४/प्रक्र/नवि-२२ दि. २६/०८/२०१४ हा शासन निर्णय पुणे महापालिकेस लागू करण्यात आला त्यामध्ये एकसमान संवर्गातील कनिष्ठ अभियंता ते शाखा अभियंता (स्थापत्य/विद्युत) पदोन्नतीसाठी यांना वेगळा नियम व कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) यांना थेट उप अभियंता हि पदोन्नती देताना शाखा अभियंता हे पद वगळण्यात आले त्यासाठी वेगळा नियम लावण्यात आल्या चे निदर्शनास येणे, एकाच संवर्गातील (अभियांत्रिकी) स्थापत्य/विद्युत सन २०१४ च्या पूर्वी कामावर नियुक्त झालेल्या कनिष्ठ अभियंता यांना शाखा अभियंता पदावर पदोन्नतीसाठी विभागीय परीक्षेची अट शिथिल केली असणे, शासनामार्फत जा.क्र.पीएमसी/२०२२/प्रक्र-१२८/नवि-२२ दि.१४/१२/२०२२ नुसार पुणे महानगरपालिकेत सन २०१४ पूर्वी नियुक्त झालेल्या अभियांत्रिकी संवर्गाकरिता विभागीय परीक्षा रद्द करणेबाबत आपल्या स्तरावर घेण्यात आलेल्या निर्णयाप्रमाणे २०१४ नंतर नियुक्त झालेल्या अभियांत्रिकी संवर्गाच्या विभागीय परीक्षेबाबत आपल्या स्तरावर कार्यवाही करावी असे आदेश देणे, शहर अभियंता, पुणे महानगरपालिका अभियांत्रिकी विभागप्रमुख यांचेकडून मागविण्यात आलेल्या अभिप्रायानुसार शहर अभियंता यांनी सदर विभागीय हि परीक्षा रद्द करावे असा स्पष्ट अभिप्राय देण्यात येणे, शासनाकडील जाक्र पीएमसी-२०२५/प्रक्र५३३/नवि-२२ दिनांक २५/०९/२०२५ चे च्या पत्रानुसार मा.उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री यांनी दिलेल्या आदेशान्वये विभागीय परीक्षेतील सूटबाबत कोणतीही कारवाई करण्यात आली नसणे, विभागीय परीक्षा रद्द करणेबाबत सर्व स्पष्ट अभिप्राय, शासनाचे आदेश, मा.उच्च न्यायालयाचे आदेश असताना देखील १० वर्षापासून कनिष्ठ अभियंता पदावर काम करणाऱ्या व शाखा अभियंता पदावर वेळेत पदोन्नती न मिळालेल्या सेवकांना महानगरपालिका सेवा प्रवेश नियमावली २०१४ (RR) तील चुकीच्या नियमामुळे त्यांची सेवाज्येष्ठता गमवावी लागणार असलेने त्यांच्यावर अन्याय होणार असल्याने या अन्यायास जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता, सेवाप्रवेश नियमावली २०१४ (RR) मध्ये चुकीच्या नियमामुळे कोणत्याही अभियांत्रिकी सेवेतील सेवकाची सेवाज्येष्ठता व्यपगत होणार नाही आणि सेवकांवर अन्याय होणार नाही, अभियांत्रिकी संवर्गातील यांत्रिकी सेवाप्रमाणे पदोन्नतीसाठी स्थापत्य व विद्युत यांना एक समान न्याय देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

पुणे महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१४ दिनांक २६/०८/२०१४ अन्वये मंजूर करण्यात आले आहेत. सदर सेवाप्रवेश नियमानुसार यांत्रिकी संवर्गामध्ये कनिष्ठ अभियंता या पदावरून उप अभियंता या पदावर आणि कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/विद्युत) पदावरून शाखा अभियंता व

त्यानंतर उपअभियंता या पदावर पदोन्नती देण्याची तरतूद विहीत करण्यात आली आहे. सदर तरतूदीनुसार वर नमूद पदांवरील पदोन्नतीची कार्यवाही केली जाते.

"पुणे महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१४" नुसार कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/विद्युत/यांत्रिकी) महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण संस्था, नाशिक यांचेकडून घेतली जाणारी विभागीय परीक्षा (मेटा) ही ४ वर्षांत व ३ संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. शहर अभियंता यांनी शिफारस केलेली असली तरी शासन मंजूर आणि नियुक्ती समयी लागू असलेले सेवा प्रवेश नियम विचारात घेऊन सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार सन २०१४ नंतर नियुक्त सेवकांना विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक ठेवलेले आहे.

पुणे महानगरपालिकेकडील कनिष्ठ अभियंता ते शाखा अभियंता पदावरील पदोन्नतीकरीता सेवाप्रवेश नियमानुसार विहीत करण्यात आलेली अट शिथिल करण्याबाबत प्राप्त पत्रावरील निर्देशानुसार पुणे महानगरपालिकेकडून दि.२५/०९/२०२५ रोजीच्या पत्रान्वये अहवाल मागविण्यात आला आहे. त्याचप्रमाणे सदर विषयाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने अद्यापी कोणतीही अंतरिम आदेश पारीत केलेले नाहीत.

तसेच, पुणे महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१४ नुसार निर्वाचनाच्या शक्ती या नियमातील तरतुदीनुसार अधिका-यांच्या/कर्मचा-यांच्या एखाद्या संवर्गास कोणती विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे वा कोणत्या संवर्गास ही परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट आहे. यासंबंधी कोणताही विवाद उत्पन्न झाल्यास त्याबाबतचा आयुक्त यांचा निर्णय अंतिम असेल, अशी तरतूद आहे.

पुणे महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१४ नुसार मंजुरी पूर्वी नियुक्त सेवकांना विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्याची अट त्यांचे नियुक्ती समयी नसल्याने या अटीतून सूट देण्याचा निर्णय झालेला असल्याने जबाबदारी निश्चित करणे व कारवाई करणेचा प्रश्न उद्भवत नाही.

पुणे महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१४ नुसार कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/विद्युत/यांत्रिकी) महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण संस्था, नाशिक यांचेकडून घेतली जाणारी विभागीय परीक्षा (मेटा) ही ४ वर्षांत व ३ संधीत उत्तीर्ण होण्याची तरतूद असल्याने, सेवकांवर अन्याय होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

*******

नगर विकास विभाग लक्षवेधी सूचना क्र. २५४०

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२६ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**श्री. शंकर पांडुरंग जगताप, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२५४० पुढीलप्रमाणे आहे :-**

"पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने सन १९७२ साली थेरगाव, वाल्हेकरवाडी, काळेवाडी, वाकड ठिकाणच्या आरक्षित केलेल्या शेतजमिनी, जागांवर १९८०-९० च्या दशकात स्थानिक शेतकऱ्यांनी गुंठा, दोनगुंठे प्लॉटिंग करून विक्री केलेल्या जमिनीवर गरजू अल्प मध्यम उत्पन्न गटातील कामगार, नागरिकांनी स्वतः राहण्यासाठी घरे बांधून तेथे मागील चाळीस-पंचेचाळीस वर्षापासून वास्तव्यास असणे, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे पुणे महानगरविकास प्राधिकरणामध्ये विलिनीकरण करताना नागरी वस्तीचा ताबा मनपाला हस्तांतरित केलेल्या भूखंडांवर नागरिकांनी बांधण्यात आलेल्या घरांना मनपाच्या वतीने नियमित मालमत्ताकर, पाणीपट्टी आकारण्यात येणे, महावितरणच्या वतीने सदर बांधकामावर नागरिकांच्या नावे वीजमीटर देऊन आकारणीही करण्यात येणे, मनपाच्या वतीने सदर रहिवासी वसाहतींची रीतसर नोंदणी करून सर्वप्रकारच्या नागरी सुविधा पुरविल्या जाणे, मात्र त्यांच्या मालकी हक्का संदर्भात सातबारा उतारा, प्रॉपर्टीकार्ड उपलब्ध नसल्याने ताबेदार नागरिकांच्या जमिनी नावावर नसल्याने प्लॅनमंजुरी अधिकृत बांधकाम, गृहकर्ज, नोंदणी, हस्तांतर, कायदेशीर संरक्षण मिळण्यास अडचणी येणे, पिंपरी-चिंचवड मनपाच्या दि.१८.०६.२०२१ रोजीच्या आमसभेतील कार्यपत्रिका क्र. ५९ च्या ठरावानुसार अशा नागरिकांकडे ताबा असलेल्या क्षेत्रानुसार केवळ एक रुपया नाममात्र दराने प्रीमियम भरून अधिकृतनोंद करून हस्तांतरित करण्यास मान्यता दिली असल्याने ताबेदार नागरिकांना ७/१२ व प्रॉपर्टी कार्ड मिळण्याकरिता घरपट्टी, पाणीपट्टी, लाईटबिल हे ताबा प्रमाणपत्राचा पुरावा ग्राह्य धरण्यात येऊन सदर ताबेदारांच्या नावावर ७/१२ व प्रॉपर्टीकार्ड काढण्याची प्रक्रिया विशेष बाब म्हणून मंजूर करून शहरातील हजारो मध्यमवर्गीय कुटुंबीयांना हक्काचे घर, कायदेशीर सुरक्षितता, नागरी सुविधा व कायदेशीर अडचणीपासून दिलासा देण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याची नितांत आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

### मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने आरक्षित केलेल्या जागे मधील ज्या मालमत्ताधारकाने मालकी हक्काचा पुरावा सादर केलेला नाही, अशा मालमत्ताधारकांची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १३९ व कलम १४० मधील तरतूदीनुसार मालमत्ताधारकांचे भोगवटा सदरी नाव नमूद करून कर आकारणी करण्यात येते. पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर संकलन विभागामार्फत सन २०२३ मध्ये मालमत्तांचे सर्वेक्षण करण्यात आलेले आहे. सर्वेक्षणानुसार नवनगर विकास प्राधिकरणाने वाल्हेकरवाडी, काळेवाडी या ठिकाणी आरक्षित केलेल्या जागेमधील मालमत्तांची संख्या २३,५६८ इतकी आहे.

थेरगाव, वाल्हेकरवाडी, काळेवाडी, वाकड या भागात नागरिकांच्या आवश्यक गरजा लक्षात घेता पिंपरी चिंचवड मनपाच्या स्थापत्य विभागामार्फत डांबरी रस्ते, पेव्हिंग ब्लॉक, पावसाळी वाहिन्या इ. किमान माफक स्वरूपाच्या नागरी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत. तसेच, वाल्हेकरवाडी व काळेवाडी येथे विकास योजना आराखड्यानुसार प्राथमिक शाळा इमारत विकसित करण्यात आलेल्या आहेत.

थेरगाव, वाल्हेकरवाडी, काळेवाडी, वाकड हा भाग पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडून अस्तित्वातील अतिक्रमणासह पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस हस्तांतरित करण्यात आलेला आहे. सदर भागात नागरिकांच्या आवश्यक गरजा लक्षात घेता व मानवतेच्या नात्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत पाण्याच्या उंच टाक्या, घरगुती व व्यावसायिक नळजोड देणे, सर्व नळजोडांना मीटर लावणे व माफक दरात पाणीपट्टी बील आकारणे इ. सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.

शासन अधिसूचनेमधील प्रस्तावाच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका सभेमध्ये चर्चा होऊन ठराव क्र. ६४९, दि. १८/०६/२०२१ नुसार आरक्षित असणाऱ्या परंतु प्रत्यक्षात नवनगर विकास प्राधिकरणाच्या ताब्यात नसणाऱ्या भूखंडावर ज्या नागरिकांनी स्वतः राहण्यासाठी घरे बांधलेली आहेत, अशा सर्व नागरिकांकडे ताबा असलेल्या क्षेत्रानुसार रु. १ या नाममात्र दराने हस्तांतरीत करण्यात यावा असा सदस्य पारित ठराव महासभेने पास केलेला आहे. सदर जमिनींची ताबा पावती प्राप्त आहे. तथापि, मालकी हक्काबाबत कागदपत्रे मनपाकडे प्राप्त नाही. याबाबत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे पाठपुरावा सुरु आहे.

सदर अतिक्रमण झालेले भूखंड ज्यावर नागरिकांनी स्वतः राहण्यासाठी घरे बांधलेली आहेत. अशा सर्व नागरीकांकडे ताबा असलेल्या क्षेत्रानुसार रु.१/- या नाममात्र दराने हस्तांतरित करण्याबाबत महापालिकेचे कोणतेही धोरण नाही. अशा स्वरूपाचे आरक्षित असणाऱ्या परंतू प्रत्यक्षात नवनगर विकास प्राधिकरणाच्या ताब्यात नसणाऱ्या भूखंड ज्यावर नागरिकांनी स्वतः राहण्यासाठी घरे बांधलेली आहेत, अशा जागांचे ७/१२ प्रॉपर्टी कार्ड नोंद करुन देण्यापूर्वी सदरच्या जागा प्रथमतः पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नावे करण्याची कार्यवाही करावी लागेल व तद्नंतर गुंठेवारी कायदा, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कायद्यातील विद्यमान नियम आणि तरतूदींच्या अनुषंगाने उपरोक्त भूखंड ज्यावर नागरिकांनी स्वतः राहण्यासाठी घरे बांधलेली आहेत असे भूखंड हस्तांतरण करण्याबाबत विचार करण्यात येईल.

*****

**लक्षवेधी सूचना क्रमांक :-५८६**

## महाराष्ट्र विधानसभा

### सन २०२६ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. शांताराम मोरे, वि.स.स. यांची महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.५८६ पुढील प्रमाणे आहे :-

“औदयोगिक विकास व्हावा स्थानिकांना रोजगार उपलब्ध व्हावा या उद‌देशाने सन १९९५ मध्ये महाराष्ट्र शासनाने "डी प्लस" धोरण जाहीर करणे, या धोरणानुसार उदयोग व खणीकर्म विभागाने वाडा तालुक्यातील (जि. पालघर) येथील चिंचघर, बिलावली व डोंगस्ते हद्दीतील प्रियदर्शनी सहकारी औदयोगिक संकुल स्थापन करणे, उक्तगावातील शेतक-यांच्या शेत जमीनीवर प्रत्यक्षात आजवर कोणतेही औद्योगिक प्रकल्प सुरु नसणे, शासनाच्या नियमाप्रमाणे ठराविक कालावधीत औदयोगिकरण करणे बंधनकारक असणे, असे न झाल्यास मुळ शेतक-यांना ती जमीन मूळ खरेदी किंमतीत परत घेण्याचा अधिकार असणे, असे असतांनाही औदयोगिकरणाची सुरवातही नसल्याने मुळ शेतकरी आपल्या जमीनीपासून वंचित होणे, औदयोगिकरणासाठी जमीन घेतल्यामुळे त्यावर शेती उत्पन्न शेतक-यांना घेता न येणे, रोजगारांच्या संधी नसणे, स्थानिक ग्रामपंचायतीनाही कर उत्पन्नाला मुकावे लागणे, जमीनी ओसाड पडल्याने संपूर्ण परिसराचा विकास ठप्प होणे, औदयोगिकरण होत नसल्याने शेतक-यांनी महसूल अधिकारी व विविध महसूल प्राधिकरणांकडे जमीनी परत मिळण्याबाबत दाखल केलेले दावे, सदर दावे विविध कारण दाखवून फेटाळण्यात येणे, परिणामी शेतक-यांमध्ये निर्माण झालेली असंतोषाचे व चिडेची भावना, औदयोगिक समुहाविरोधात शेतक-यांनी आंदोलनाचा निर्धार, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तात्काळ लक्ष घालून शेतक-यांच्या जमीनी तात्काळ परत देण्याबाबत शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

**<u>श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन</u>**

सामुहिक प्रोत्साहन योजना १९८३ व १९८८ नुसार वाडा तालुक्याचा समावेश D प्रवर्गात व सामुहिक प्रोत्साहन योजना १९९३, २००१, २००७, २०१३ व २०१९ नुसार वाडा तालुक्याचा समावेश D + प्रवर्गात केलेला असून या भागातील उद्योगांसाठी विविध स्वरूपाच्या सवलती देण्यात आलेल्या आहेत.

विकास आयुक्त, (उद्योग) यांचे दि.३१/०७/१९९६ रोजीच्या आदेशान्वये मे. प्रियदर्शनी को ऑप. इंडस्ट्रियल ईस्टेट लिमिटेड यांना मौजे **चिंचघर, बिलावली, खरीवली, आंबिस्ते,** ता. वाडा, जि. ठाणे (पालघर) येथील एकूण २३१.७० हे. आर जमीन खरेदी करणेसाठी महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ६३ (१) अ (II) अंतर्गत अध्यादेश १९९४ दि. २८/०४/१९९४ अन्वये जमीन खरेदी करणेसाठी परवानगी देणेंत आलेली आहे.

तदनंतर उद्योग संचालनालय मार्फत मे. प्रियदर्शनी को ऑप. इंडस्ट्रियल ईस्टेट लिमिटेड यांना दि. ३०/१०/१९९८, दि. १४/०२/२०००, दि.१८/०१/२००१ व दि.२८/०६/२०११ अन्वये जमीन खरेदी करण्यासाठी वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

(रोटा)एम २८२(१००-४-२०२६)-१

उद्योग संचालनालयामार्फत मे. प्रियदर्शनी को ऑप. इंडस्ट्रियल ईस्टेट लिमिटेड यांना देण्यात आलेल्या परवानगीच्या अनुषंगाने त्यांनी मौजे चिंचघर येथील ४६.५२.८० हे. आर, मौजे बिलावली येथे ४३.७२.९० हे. आर व मौजे डोंगस्ते येथे २.३४.२० हे. आर जमीन खरेदी केलेली आहे.

मौजे चिंचघर, ता. वाडा, जि. पालघर येथील १३ खातेदार यांनी प्रस्तुत कंपनी यांनी औद्योगिक जमिनीचा वापर औद्योगिक कारणासाठी न केल्याने जमीन मुळ मालकाला खरेदी करण्याची तरतुद असल्याने त्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, जव्हार यांचेकडे अपिल अर्ज दाखल केले. तसेच मंडळ अधिकारी यांनी शर्तभंगाचे प्रस्ताव सादर केले होते. शर्तभंगाचे प्रस्तावास अनुसरून उपविभागीय अधिकारी जव्हार यांनी सुनावणी घेऊन, दावा प्रकरणांत सदर कंपनीने विकास काम करुन अकृषिक वापर सुरु केल्याचे नमुद करून उपविभागीय अधिकारी जव्हार यांनी दिनांक ०२/०८/२०१३ रोजीचे आदेशान्वये सदरचे दावे फेटाळण्यात आलेले आहेत. तथापि, सदर आदेशा विरुध्द संबंधित अर्जदार यांनी महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यांचेकडे पुनरिक्षण अर्ज दाखल केले होते. तथापि, सदर अर्ज दि. १६.०२.२०१६ रोजी मागे घेण्यात आलेले दिसून येत आहेत.

मौजे बिलावली, ता. वाडा, जि. पालघर येथील ०७ खातेदार यांनी प्रस्तुत कंपनी यांनी औद्योगिक जमिनीचा वापर औद्योगिक कारणासाठी न केल्याने जमीन मुळ मालकाला खरेदी करण्याची तरतुद असल्याने त्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी जव्हार यांचेकडे अपिल अर्ज दाखल केले. तसेच मंडळ अधिकारी यांनी शर्तभंगाचे प्रस्ताव सादर केले होते. शर्तभंगाचे प्रस्तावास अनुसरून उपविभागीय अधिकारी जव्हार यांनी सुनावणी घेऊन दावा प्रकरणांत सदर कंपनीने विकास काम करुन अकृषिक वापर सुरु केल्याचे नमुद करून उपविभागीय अधिकारी जव्हार यांनी दिनांक ०२/०८/२०१३ रोजीचे आदेशान्वये सदरचे दावे फेटाळण्यात आलेले आहेत. तथापि, सदर आदेशा विरुध्द संबंधित अर्जदार यांनी महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यांचेकडे पुनरिक्षण अर्ज दाखल केले होते. तथापि, सदर अर्ज दि. १६.०२.२०१६ रोजी मागे घेण्यात आलेले दिसून येत आहेत.

तसेच, मौजे डोंगस्ते ता. वाडा, जि. पालघर येथील गट नं. ८/२/ब क्षेत्र १.३७.५ हे.आर (श्रीम. राहिबाई दगडू पाटील व इतर) या ठिकाणच्या जमिनीबाबत महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यांचेकडे पुनरिक्षण अर्ज दाखल केले होते. तथापि, सदर अर्ज दि. ०५.१२.२०१७ रोजीच्या आदेशानुसार Res - judicata तत्वाची बाधा असल्याने अर्जदार यांचा अर्ज फेटाळण्यात आला.

तथापि, प्रस्तुत प्रकरणी संबंधित कंपनीने औद्योगिक प्रयोजनासाठी खरेदी केलेल्या जमिनींचा औद्योगिक कामासाठी वापर न केल्यामुळे अप्पर जिल्हाधिकारी, पालघर यांनी दि. २९.१०.२०२१ रोजीच्या आदेशान्वये मौजे चिंचघर येथील गट नं. ४७७, ३६, ४४०, ४५९, बिलावली येथील गट नं. ५४९, ५५२, ५६१,१०७/३ व डोंगस्ते येथील गट नं. १०/१/अ येथील जमिनी शासनजमा करणेबाबतचे आदेश पारीत केलेले आहेत.

उक्त नमूद वस्तुस्थिती विचारात घेता असे निदर्शनास येते की, मे. प्रियदर्शनी को ऑप. इंडस्ट्रियल ईस्टेट लिमिटेड यांनी मौजे चिंचघर, मौजे बिलावली, मौजे डोंगस्ते ता. वाडा, जि. पालघर येथील उक्त नमूद जमिनी

प्रश्न २८२-१अ

मौजे महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ६३ (१) अ मधील तरतुदीनुसार खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनासाठी सन १९९८ ते २०१३ या कालावधीत खरेदी केलेल्या असून कायद्यातील तरतुदीनुसार विहीत १५ वर्षांच्या कालावधीत कंपनीमार्फत सदर जमिनींचा अद्याप खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनासाठी वापर केलेला नसल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत आहे. सदर बाब विचारात घेता संबंधित कंपनीने वाडा तालुक्यात महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ६३ (१) अ मधील तरतुदीनुसार खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनासाठी खरेदी केलेल्या जमिनींबाबत बिगरउपयोजन कराचा भरणा केला किंवा कसे, वेळोवेळी मुदतवाढी घेतल्या किंवा कसे, विहीत १५ वर्षांचा कालावधी संपलेला असताना व केवळ अकृषिक परवानगी प्राप्त केल्यामुळे संबंधित शेतकऱ्यांचा दावा फेटाळण्याबाबतची कारणमिमांसा याबाबत संपूर्ण प्रकरणाची विभागीय आयुक्त, कोकण यांचेमार्फत एक महिन्यात चौकशी करुन चौकशी अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

************

एच २८२-२

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२६ चे (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**

**मा. श्री. सुनिल प्रभू, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेले लक्षवेधी सूचना क्र. २२१८ पुढीलप्रमाणे आहे :-**

"जि. ठाणे, महसूल विभागाचे कल्याण उपविभागीय अधिकारी व कार्यालयातील कर्मचारी यांच्या मार्फत भूसंपादन, तसेच सातबारा फेरफार संबंधी विविध कामे हाताळण्यात येणे, सदरहू कामे करताना या कार्यालायतील श्री. विश्वास गुजर व श्री. भाऊसाहेब नांगरे या भ्रष्ट अधिका-यांकडून नागरिकांकडे प्रत्येक कामासाठी केली जात असलेले पैशाची मागणी, पैशांची पूर्तता न करणाऱ्या नागरिकांची कामे प्रलंबित ठेवण्यात येणे, त्यामुळे सदरहू कार्यालयात अनेक प्रकरणे न्यायासाठी प्रलंबित असल्याची बाब माहे जून २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, परिणामी सामान्य जनतेस न्याय मिळण्यात निर्माण झालेला अडसर, सदर न्यायाधिकरणातील दाव्याच्या सुनावणीस सातत्याने मिळत असलेल्या तारखा, दाव्याच्या सुनावणी जलदगतीने निर्णीत होत नसल्याने पक्षकारांच्या मनात निर्माण झालेली नाराजीची भावना, सदरहू प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी चुकीचे उत्तर पाठवून शासनाची दिशाभूल करण्यात येणे, यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना भ्रष्ट्राचार करण्यास संधी प्राप्त होणे, यास्तव संबंधित अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट कारभारांची तातडीने सखोल चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया"

---

**<u>मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन</u>**

कल्याण उपविभागीय अधिकारी कार्यालयामध्ये हक्कनोंद, भूसंपादन, अर्धन्यायिक अपिले, आस्थापना विषयक बाबी, माहितीचा अधिकार, फौजदारी प्रकरणे इत्यादी कामे हाताळण्यात येतात. श्री. विश्वास गुजर हे उपविभागीय अधिकारी, कल्याण या पदावर दि.३१/०८/२०२३ रोजी हजर झाले असून त्यांचे कालावधीत प्रलंबित अर्धन्यायिक प्रकरणांचा गोषवारा पुढील तक्त्याप्रमाणे आहे:-

| दाव्याचा प्रकार | माहे ऑगस्ट २०२३ अखेर प्रलंबित दाव्यांची संख्या | दाखल दावे व आदेश पारीत केलेल्या दाव्यांची संख्या | | | | | | एकुण शिल्लक दावे | रकाना क्र.९ मधील दाव्यांचा कालावधीनिहाय प्रलंबिततेचा तपशील | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दि.०१/०९/२०२३ ते दि.३१/१२/२०२४ | | दि.०१/०१/२०२४ ते दि.३१/१२/२०२४ | | दि.०१/०१/२०२५ ते दि.३०/११/२०२५ | | | अ.क्र.४ पैकी १ वर्षाखालील प्रलंबित प्रकरणे दिनांक (०१/१२/२०२४ ते ३०/११/२०२५) | अ.क्र.४ पैकी १ ते २ वर्षामधील प्रलंबित प्रकरणे दिनांक (०१/१२/२०२४ ते ३०/११/२०२५) | अ.क्र.४ पैकी २ वर्षावरील प्रलंबित प्रकरणे |
| | | आवक | निकाली | आवक | निकाली | आवक | निकाली | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| आरटीएस | १९३ | २४६ | १४७ | ३३५ | ३२७ | ७८ | १२२ | २५६ | १६४ | ८२ | १० |
| टेनन्सी | ५५ | ७५ | ३६ | ८१ | १०२ | १९ | २९ | ६३ | ३६ | २१ | ०६ |
| **एकूण** | **२४८** | **३२१** | **१८३** | **४१६** | **४२९** | **९७** | **१५१** | **३१९** | **२००** | **१०३** | **१६** |

उपरोक्त तक्त्यामधील रकाना क्र. ९ मध्ये नमूद दाव्यांपैकी काही दावे अंतिम आदेशासाठी बंद करण्यात आले आहेत; तथापि, अद्याप अंतिम आदेश पारित न झाल्यामुळे हे दावे प्रलंबित दर्शविण्यात आले आहेत. या कोष्टकावरून असे स्पष्ट होते की, संबंधित दाव्यांचे कामकाज गतीने पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. एकूण प्रलंबित ३१९ प्रकरणांपैकी तब्बल २०० प्रकरणे ही केवळ एका वर्षाच्या आतील आहेत; याचाच अर्थ जुनी प्रकरणे प्राधान्याने निकाली काढण्यावर प्रशासनाने विशेष भर दिला आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २५५ व २५७ मधील सुधारणेनुसार, अर्धन्यायिक प्रकरणे एक वर्षाच्या आत निकाली काढण्याची कालमर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. विहित कालमर्यादेत काही प्रकरणे निकाली निघू न शकल्यास, संबंधित नियंत्रक प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने हा कालावधी जास्तीत जास्त सहा महिन्यांपर्यंत वाढविता येतो, अशी कायदेशीर तरतूद आहे. सदर तरतूद तसेच महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक १७/१२/२०१५ आणि शासन परिपत्रक दिनांक०३/०८/२०१६ मधील मार्गदर्शक तत्त्वांनुसार, दिनांक ३०/०५/२०२५ रोजी या प्रकरणांना मुदतवाढ देण्यात आली आहे.

सद्यस्थितीत प्रलंबित असलेली सर्व अपिले प्राधान्याने निकाली काढण्याची पूर्ण दक्षता घेतली जात आहे. तथापि, १४४-कल्याण ग्रामीणचे मतदार नोंदणी अधिकारी, लोकसभा व विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, आणि कुळगाव बदलापूर नगरपरिषद निवडणूक २०२५ चे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून निवडणूकविषयक विविध महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागल्या आहेत. यासोबतच "विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण" मोहिमेचे कामकाज, राजशिष्टाचार (Protocols), नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन, तसेच भूसंपादनाशी संबंधित न्यायालयीन व अर्धन्यायिक सुनावणी आणि आढावा बैठकांमधील सातत्यपूर्ण उपस्थिती, या अनिवार्य शासकीय कर्तव्यांमुळे अपिलांचा निपटारा करण्यास काहीसा विलंब झाला आहे.

त्याचप्रमाणे, या प्रकरणांमधील बहुतांश पक्षकार कल्याण तालुक्याबाहेरील व शेतकरी वर्गातील आहेत. त्यांच्या तांत्रिक अज्ञानामुळे अपिलातील त्रुटींची पूर्तता वेळेवर होत नाही; ज्यामध्ये वकिलांची नेमणूक करणे, मृत व्यक्तीच्या वारसांची नावे रेकॉर्डवर आणणे, सामनेवाल्यांचे परिपूर्ण पत्ते उपलब्ध नसणे आणि आवश्यक कागदपत्रांची वेळेत पूर्तता न करणे यांसारख्या अडचणी उद्भवतात. त्यातच पक्षकारांना नोटिसा पोहोचण्यास होणारा विलंब, पक्षकार हजर न झाल्यास त्यांच्या स्थानिक वृत्तपत्रांमध्ये जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याची कायदेशीर आवश्यकता, आणि उभय पक्षकारांकडून वेळोवेळी मागितली जाणारी मुदत (पुढील तारखा) यामुळे अंतिम निर्णय प्रलंबित राहतात.

तथापि, या सर्व अडचणींवर मात करून प्रत्येक प्रकरणामध्ये प्राधान्याने आणि गतीने कार्यवाही करण्याची दक्षता कार्यालय स्तरावर घेतली जात आहे. कार्यालयातील कोणत्याही अधिकारी अथवा कर्मचाऱ्याने कोणत्याही कामासाठी पैशांची मागणी केलेली नसून, सर्व कामकाज हे प्रचलित शासन नियम, कायदेशीर तरतुदी आणि पारदर्शकतेचा अवलंब करूनच केले जात आहे.

************

नगर विकास विभाग | लक्षवेधी सूचना क्रमांक २४०३

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२६ चे प्रथम अधिवेशन**

**श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२४०३ पुढीलप्रमाणे आहे :-**

"नगरपंचायत कुही (जि.नागपूर) येथील अध्यक्षा व त्यांचे पती यांची शेती नसताना त्यांनी शेतपीक नुकसानीचे अनुदान घेऊन शासनाची फसवणूक केली असल्याचे दि.०४.०२.२०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, त्यामुळे त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करुन त्यांना नगराध्यक्षा पदावरुन बडतर्फ करण्याबाबतचा तक्रार अर्ज सह सचिव, मा.मुख्यमंत्री सचिवालय कक्ष, नागपुर विभाग यांना दि.०९.०१.२०२६ रोजी दाखल होणे, यासंदर्भात मा.तहसिलदार, कुही यांनी आपला चौकशी अहवाल सादर केला असतानाही त्या अनुषंगाने कारवाईस शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी त्यांना शासन पाठीशी घालीत असल्याची येथील जनतेची भावना, व्यक्त होत असलेला असंतोष, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया."

**मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन**

सन २०२२ या वर्षात नैसर्गिक आपत्ती अनुदान वाटपात नागपूर जिल्ह्यातील कुही तालुक्यात झालेल्या अनियमिततेबाबत उपविभागीय अधिकारी, उमरेड यांच्या अध्यक्षतेखालील चौकशी समितीने चौकशी करून दि.२३.०८.२०२४ रोजी जिल्हाधिकारी,नागपूर यांना अहवाल सादर केला.

सदर चौकशी समितीने केलेल्या तपासणीमध्ये मौजा वग येथील तत्कालीन तलाठी यांचेकडून नगराध्यक्षा, कुही नगरपंचायत, जि.नागपूर व त्यांचे पती यांचेसह शेती नसलेल्यांना अनुदानाचे वाटप झाल्याचे आढळून आल्याने जिल्हाधिकारी, नागपूर यांनी दि.०२.०९.२०२४ रोजीच्या आदेशान्वये तत्कालीन तलाठी, मौजा वग यांना शासन सेवेतून निलंबित केले. तसेच दि.०५.१२.२०२४ रोजीच्या ज्ञापनान्वये तत्कालीन तलाठी, मौजा वग यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरू करून अपात्र व्यक्तींना वाटलेली सर्व रक्कम तत्कालीन तलाठी, मौजा वग यांच्याकडून वसूल करून शासनजमा केली आहे.

श्री.उमाजी पुनवटकर यांनी नगराध्यक्षा, कुही नगरपंचायत, जि.नागपूर व त्यांचे पती यांनी शेती नसताना शेतपीक नुकसानीचे अनुदान घेऊन शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करुन त्यांना नगराध्यक्षा पदावरुन बडतर्फ करण्याबाबत दि.०६.११.२०२५

रोजी मा.मुख्यमंत्री महोदय, मुख्यमंत्री सचिवालय, नागपूर यांच्याकडे दाखल केलेल्या तक्रारीस अनुसरुन सह सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, नागपूर यांनी त्यांच्या दि.०९.०१.२०२६ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडून अहवाल मागविला. त्यास अनुसरुन मुख्याधिकारी, कुही नगरपंचायत यांनी दि.११.०३.२०२६ रोजी जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडे अहवाल सादर केला. त्यानुषंगाने जिल्हा सहआयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, नागपूर यांनी दि.०९.०७.२०२६ रोजीच्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर केला असून महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ५५ अंतर्गत नगरराध्यक्षांच्या अनहर्तेबाबतचा प्रस्ताव अद्यापपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे कळविले आहे.

*****

विधान सभा लक्षवेधी सूचना क्र. २६१०

महाराष्ट्र विधान सभा

सन २०२६ चे प्रथम ( अर्थसंकल्पिय ) अधिवेशन

श्री. नरेंद्र भोंडेकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २६१० पुढीलप्रमाणे आहे :-

"छत्रपती संभाजीनगर येथिल गरुडझेप अकॅडमीत १२ वी सायन्समध्ये शिकत असलेल्या १७ वर्षीय एका मुलाच्या मेसचे पैसे थकल्यामुळे दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या रात्री मेसमध्ये जेवण्यासाठी गेला असता त्यास फीसबाबत विचारणा करुन त्याच्या हातावर सही घेऊन किंचित जेवण देणे मात्र या थोड्या जेवणामुळे पोट न भरल्याने पुन्हा जेवण मागण्यासाठी पुन्हा गेला असता संचालक नीलेश सोनवणे, शिक्षक स्वप्नील चव्हाण, अभिजित उर्फ बोल्ड आणि पठाण या चार शिक्षकांनी उपाशी ठेवत नाकातून रक्त येई पर्यंत बेदम मारहाण केल्याची घटना दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ च्या सुमारास निदर्शनास येणे, गरुडझेप अंतर्गत १२ वी बोर्डाच्या परीक्षेचे फुलंब्री येथील जि.प.शाळेत केंद्र असणे, त्यासाठी नाशिकच्या १०० ते १५० मुलांची शरणापूर येथील गरुडझेपच्या अकॅडमीत राहण्याची व्यवस्था असणे, त्या मुलाच्या पालकांनी २०२३-२६ या काळासाठी २ लाख ७० हजारांपैकी २.१५ लाख फी भरलेली असून मेसचे साडेचार हजार रु.नियमितपणे देत असणे, फक्त फेब्रुवारी महिन्याचे मेसचे पैसे बाकी होते मात्र, या किरकोळ थकबाकीसाठी शिक्षक स्वप्नील चव्हाण याने त्या मुलास १५ फेब्रुवारीपासून मानसिक त्रास देणे सुरू करुन २३ फेब्रुवारीला तर क्रूरतेचा कळस गाठत नाश्ता आणि दुपारच्या जेवणापासून वंचित ठेवून दिवसभर उपाशी ठेऊन रात्री जेवण मागण्यासाठी गेला असताना नाकातून रक्त येईपर्यंत बेदम मारहाण करणे, या गंभीर प्रकरणाची तक्रार दौलताबाद पोलिस ठाण्यात देऊन सुद्धा अद्यापही कोणतीही कार्यवाही केली नसल्यामुळे नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष, त्यामुळे या गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावायची कार्यवाही व उपाययोजना".

निवेदन

(मा.श्री.दादा भुसे, शालेय शिक्षण मंत्री)

ओम नितीन भालेराव हा विद्यार्थी छत्रपती संभाजीनगर येथील इंद्रायणी कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता १२ वीच्या वर्गामध्ये प्रवेशित होता. सदर विद्यार्थ्याने गरुडझेप अकॅडमी, नाशिक येथे इयत्ता १२ वी च्या शिकवणी वर्गाकरीता प्रवेश घेतला होता व तो तेथेच शिकवणी वर्गाकरीता उपस्थित रहात होता. तथापि, त्याचे इयत्ता बारावीचे परिक्षेचे केंद्र जिल्हा परिषद शाळा, फुलंब्री, छत्रपती संभाजीनगर हे असल्यामुळे परिक्षेसाठी तात्पुरता गरुडझेप अकॅडमी, छत्रपती संभाजी नगर येथे राहण्यासाठी आला होता. त्यासाठी सन २०२३ ते २०२६ या शैक्षणीक वर्षासाठी एकुण रू. २७००००/- पैकी रू. २१५०००/- इतकी फि भरलेली आहे. याव्यतिरिक्त मासिक मेस फि ४५००/- नियमित भरण्यात येत होती. मात्र फेब्रुवारी महिन्याची मेस फि बाकी असल्याने दिनांक २३.०२.२०२६ रोजी सकाळी ०९.०० ते दिनांक २६.०२.२०२६ रोजी सकाळी ०८.०० वाजताच्या दरम्यान संबंधीत विद्यार्थ्याला अकॅडमीची फेब्रुवारी महिन्याची फी न भरल्याच्या कारणावरुन तेथील शिक्षक स्वप्नील चव्हाण, अभिजीत उर्फ बोल्ड आणि पठाण या शिक्षकांनी फि वरून विचारना करत थोडे जेवण दिले. त्यानंतर पोट न

भरल्यामुळे मुलांनी ऑनलाईन बाहेरुन जेवणाचे पार्सल मागविले त्यामुळे फिस भरली नाही मात्र जेवण बाहेरून मागविले या कारणावरुन खाजगी शिकवणी वर्गाच्या या शिक्षकांनी ओम भालेराव यास मारहाण केली.

सदर प्रकरणी नमूद करण्यात येते की, सदर मारहाण ही शाळेच्या आवारामध्ये न होता खाजगी शिकवणी वर्गाच्या निवासाच्या ठिकाणी झाली आहे. संबंधीत विद्यार्थी मुलाचे वडील श्री. नितीन सुरेश भालेराव यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.२८.२.२०२६ रोजी पोलीस ठाणे,दौलताबाद येथे गु.र.न. ४०/२०२६ कलम ११५(२), ३५१(२), ३५२ भा.न्या.सं. सह कलम ३(१)(r)(s), ३(२) (va) अ.जा.ज.अ.प्र.का. प्रमाणे मारहाण करणारे आरोपी श्री.स्वप्निल चव्हाण, गरूड झेप अॅकडमी, नाशिक, श्री. अभिजीत उर्फ बोल्ड, श्री. पठाण सर व श्री. निलेश साहेबराव सोनवणे, गरूड झेप अॅकडमी, छत्रपती संभाजीनगर यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर तपास डॉ. भागिरथी पवार, सहा. पोलीस आयुक्त, छावणी विभाग, छत्रपती संभाजीनगर हे करीत आहेत. यातील पीडीत अल्पवयीन मुलगा ओम नितीन भालेराव याचे वैद्यकीय तपासणी केली आहे. सध्या गुन्हा पोलीस तपासावर असुन, गुन्हयातील आरोपी श्री.स्वप्निल चव्हाण, गरूड झेप अॅकडमी, नाशिक, श्री. अभिजीत उर्फ बोल्ड, श्री. पठाण सर व श्री. निलेश साहेबराव सोनवणे, गरूड झेप अॅकडमी, छत्रपती संभाजीनगर यांचे अटकपूर्व जामीन अर्ज मा. सत्र न्यायालय, छत्रपती संभाजीनगर यांनी दि. १८.०४.२०२६ रोजी मंजूर केला आहे. यांप्रकरणी सदर गुन्ह्याचा तपास पुर्ण करून पोलीस ठाणे दौलताबाद दोषारोपपत्र क्रमांक ५३/२०२६ दिनांक २८.०४.२०२६ अन्वये मा. विशेष जिल्हा व सत्र न्यायालय, छत्रपती संभाजी नगर येथे स्पेशल केस क्रमांक १६६/२०२६ दि. २९.०४.२०२६ अन्वये मुदतीत दोषारोप पत्र दाखल केले असून सदर गुन्हा हा न्यायप्रविष्ठ आहे.

****************************

लक्षवेधी सूचना क्र. २८९५

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२६ चे पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन

किसन कथोरे, मा. विधानसभा सदस्य यांनी प्रस्तावित केलेली महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.२८९५ पुढीलप्रमाणे आहे :-

"महाराष्ट्र राज्य जलनीती नुसार पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आलेले असणे, माननीय मुख्यमंत्री यांच्या दिनांक १३.६.२५ रोजी च्या बैठकीमध्ये बदलापूर व अंबरनाथ शहरांच्या पाणीपुरवठ्यासाठी तातडीचे उपाय योजना म्हणून अंबरनाथ तालुक्यातील इंदगाव, बेंडशीळ व नंबरवाडी या योजना कार्यान्वित करणे बाबत जलसंपदा विभाग व एम एम आर डी ए यांना निर्देश देण्यात आले असुन सदरील योजना हस्तांतरित करून घेण्यासाठी जलसंपदा विभागामार्फत जलसंधारण विभागास वारंवार मागणी करण्यात आली असून देखील नमुद योजना हस्तांतरित करण्यासाठी जलसंधारण विभागाकडून होत असणारे अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी प्रचंड मोठ्या प्रमाणावर विलंब होत असणे, त्याचा परिणाम अंबरनाथ बदलापूर कल्याण व नजीकच्या भागांना मोठ्या प्रमाणावर पाणीटंचाईला समोर जावं लागत असणे व भविष्यात तीव्र पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता असणे, सदर योजनांमुळे १००MLD पिण्याच्या पाण्याची दीर्घकालीन सोय होणार असणे, जलसंधारण विभाग शासन निर्णय ३१/५/२०१७ नुसार जलसंधारण विभागाचे कार्यक्षेत्र केवळ ६००हेक्टर पर्यंत सिंचन क्षमता असलेले प्रकल्प राबविणे असे असुन पिण्याच्या पाण्यासाठी प्रकल्प जलसंपदा विभागामार्फतच राबविणे अपेक्षीत असणे, तसेच सदर प्रकल्प जलसंपदा व एम एम आर डी ए यांनी राबविणे बाबत मा मुख्यमंत्री यांचे निर्देश असुन देखील प्रकल्प हस्तांतरित करण्यासाठी जलसंधारण विभागाची उदासीनता त्यामुळे निर्माण होणारी पाणीटंचाई याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

**************************************

### मा.मंत्री (मृद व जलसंधारण) यांचे निवेदन

बदलापूर व अंबरनाथ शहरांच्या पाणी पुरवठयासाठी तातडीची उपाययोजना म्हणून अंबरनाथ तालुक्यातील इंदगाव, बेंडशीळ व नंबरवाडी या योजनांचे सर्व्हेक्षण करुन बृहत आराखडयात समावेश करण्याबाबतचे दि.२२.०८.२०२२ चे निवेदन मा.श्री. किसन कथोरे, विधानसभा सदस्य यांनी जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, ठाणे यांना सादर केले आहे. त्यानुसार सदर योजनांचे प्राथमिक अन्वेषण व सर्व्हेक्षण करण्यात आले आहे.

सदर योजनांच्या प्राथमिक सर्व्हेक्षणाअंती योजनांचे सिंचन क्षेत्र ६०० हे. पेक्षा कमी असून, योजनांची साठवण क्षमता १०० स.घ.मी. पेक्षा अधिक असल्याचे आढळून आले आहे. सदर योजनांचा पाणी उपलब्धतेबाबतचा प्रस्ताव अप्पर आयुक्त तथा मुख्य अभियंता मृद व

जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र पुणे यांनी मुख्य अभियंता जलविज्ञान व धरणसुरक्षितता, नाशिक यांना दि.२२.०७.२०२४ पत्रान्वये सादर केला आहे. सदर प्रस्तावावर उपस्थित त्रूटींची पूर्तता करून दि. २१.०५.२०२५ च्या पत्रान्वये सदर प्रस्ताव त्यांना फेरसादर करण्यात आला आहे.

सदर योजना या पाणीपुरवठा योजना म्हणून प्रस्तावित करण्यात येणार असल्याने सदर योजनांचे प्रकल्प अहवाल सादर करण्याच्या सुचना मा. मुख्यमंत्री महोदयांनी दि.१३.०६.२०२५ रोजीच्या बैठकीत दिलेल्या असल्याने सदर योजनेशी संबंधित प्रकल्पाचे सर्वेक्षण व अन्वेषण याबाबतची कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग, शहापूर यांनी दि.११.१२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये या विभागास कळविले आहे. सदर प्रकल्प पूर्ण करण्याबाबत या विभागाकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

************************************

# महाराष्ट्र विधानसभा

## सन- २०२६ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. ४७१

श्री. किसन कथोरे, समाधान आवताडे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.४७१ पुढीलप्रमाणे आहे:-

" ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ व मुरबाड तालुक्याच्या सरहद्दीवर असलेल्या बारवी धरणात विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे पुनर्वसन करून ज्यांची घरे बाधित झाली त्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरीमध्ये सामावून घेण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्यात येणे, यामध्ये ज्या नगरपरिषदा किंवा महापालिका किंवा स्थानिक स्वराज्य संस्था या धरणाच्या पाण्याचा लाभ घेतात त्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी या वारसांना नोकरीत सामावून घेण्याबाबत निर्णय होणे, त्यानुसार या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना नोकरीत सामावून घेण्यात येणे, उर्वरित ज्यांच्याकडे पात्र लाभार्थी नाही अशा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना एकरकमी दहा लाख रुपये देण्यात येणे, परंतु नोकरीमध्ये सामावून घेतलेल्या वारसांना पदोन्नती देण्यात येणार नसल्याचे सांगण्यात येणे, तसेच ते नोकरीतून सेवानिवृत्त झाल्यास, मृत्यू झाल्यास, बडतर्फ झाल्यास किंवा काही अपरिहार्य कारणास्तव नोकरीतून स्वेच्छानिवृत्ती घेतल्यास त्यांच्या घरातील व्यक्तींना अनुकंपा तत्वावर नोकरीत सामावून न घेणे, ही बाब त्यांच्यावर अन्यायकारक असणे, त्यामुळे याबाबतीत त्यांनी वेळोवेळी पत्रव्यवहार करूनही त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाबाबत शासनाने कोणतीही प्रतिक्रिया न देणे, त्यामुळे या बारवी धरण प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या नोकरीत सामावून घेतलेल्या वारसांवर अन्याय होणे, याकरीता राज्य शासनाने त्यांच्यावर होणारा अन्याय दूर करण्याबाबत शासनाने कारवायाची वा करण्यात येणारी कार्यवाही व उपाययोजना."

### मा.मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वागळे इस्टेट, डोंबिवली, कल्याण, भिवंडी, टी.टी.सी., तळोजा, अंबरनाथ, बदलापूर या औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांना व विविध स्थानिक स्वराज्य संस्थांना पाणी पुरवठा करण्यासाठी बारवी नदीवर पिंपळोली, तालुका अंबरनाथ, जि. ठाणे येथे सन १९७२ मध्ये म.औ.वि. महामंडळाकडून बारवी धरण बांधण्यात आले आहे.

म.औ.वि. महामंडळाच्या बारवी धरण प्रकल्पामध्ये १२ गावे बाधित झाली. त्यापैकी पहिला टप्पा सन- १९७२ व दुसरा टप्पा सन- १९८६ मध्ये राबविण्यात आला. तथापि, पाणीसाठा मुबलक प्रमाणात जमा होण्याच्या दृष्टीने बारवी धरणाची उंची वाढविण्यासाठी मऔवि महामंडळामार्फत तिसरा टप्पा हाती घेण्यात आला असून सदर टप्प्याअंतर्गत एकूण सहा गावे व पाच संलग्न पाडे विस्थापित झाले आहेत. सदर विस्थापितांचे पुनर्वसनाचे काम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने सदर गावांतील रहिवाश्यांच्या उपजिवीकेचे साधन म्हणून प्रकल्पग्रस्त कुटुंबातील एका व्यक्तीस नोकरी अथवा रोखीने मोबदला अदा करण्याची मागणी करण्यात आली होती.

बारवी प्रकल्पबाधितांच्या उक्त मागणीच्या अनुषंगाने बारवी धरणातून उपलब्ध पाण्याच्या वापराच्या समन्यायी तत्वावर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आस्थापनेवर सामावून घेण्याकरीता मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. १०/०८/२०१६ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत मा. मुख्यमंत्री महोदयांनी बारवी धरण प्रकल्पग्रस्तांना बारवी धरणातील पाणी वापराच्या समन्यायी तत्वानुसार आस्थापनेवर घेण्याकरीता धोरण निश्चित करण्याचे निर्देश दिले होते.

त्याअनुषंगाने मा. मंत्रीमंडळाच्या दि. २९/०८/२०१७ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार बारवी धरणाची उंची वाढविल्यामुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पबाधितांना पाण्याच्या वापराच्या समन्यायी पध्दतीने म.औ.वि. महामंडळात सामावून घेण्याबाबत नगर विकास विभाग, शासन निर्णय, दि. १८/०९/२०१७ अन्वये

बारवी धरणाची उंची वाढविल्याने उपलब्ध होणाऱ्या अतिरिक्त पाणी वापराच्या समन्यायी तत्वावर बारवी धरण प्रकल्पग्रस्तांना सेवेत सामावून घेण्याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

१. बारवी धरणाच्या वाढलेल्या उंचीमुळे प्राप्त अतिरिक्त ४४६ द.ल.लि. पाण्याचा वापर करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अतिरिक्त पाणी वापराच्या समन्यायी तत्वावर सेवेत सामावून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी अंतिम केलेल्या दि. १८/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार बारवी धरण प्रकल्पग्रस्तांच्या विहित करण्यात आलेले ५% आरक्षण व भुकंपग्रस्तांसाठी विहित करण्यात आलेले २% आरक्षण असे ७% आरक्षणाच्या मर्यादेत बारवी धरणग्रस्तांमुळे बाधित झालेल्या कुटुंबातील एका व्यक्तीस संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या सेवेत विहित पध्दतीने सामावून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. दि. १८/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार बारवी धरण प्रकल्पग्रस्तांना आरक्षित ७% पदाच्या मर्यादेत सामावून घेणे करीता पदे उपलब्ध नसल्यास अथवा कमी पडत असल्यास "गट क" व "गट ड" मधील आवश्यक अधिसंख्य पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर व्यक्ती सेवानिवृत्त झाल्यास अथवा कोणत्याही कारणास्तव सेवा देण्यास सक्षम न ठरल्यास (मृत्यु, बडतर्फी, सेवा सोडून जाणे इत्यादी) सदर पदे आपोआप व्यपगत होईल.

४. अधिसंख्य म्हणून निर्माण करण्यात येणारी पदे फक्त बारवी प्रकल्पग्रस्तांमधूनच भरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

उपरोक्त नगर विकास विभागाच्या दि. १८/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार बारवी धरणामुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पबाधितांना, नोकरी देण्यासाठी जिल्हाधिकारी, ठाणे यांनी ज्या नगर परिषदा किंवा महापालिका किंवा स्थानिक स्वराज्य संस्था या धरणाच्या पाण्याचा लाभ घेतात त्या स्थानिक स्वराज्य संस्थानी प्रकल्पबाधितांच्या वारसांना नोकरीत समावून घेण्यासाठी संस्थानिहाय नोकरीकरीता पदसंख्या निश्चित केली त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | पाणी वापरकर्ता संस्था | प्रकल्पबाधितांना सेवेत सामावून घेण्याची सुधारीत पदसंख्या |
|---|---|---|
| १. | ठाणे मनपा | ६२ |
| २. | मिरा-भाईंदर मनपा | २१० |
| ३. | कल्याण - डोंबिवली मनपा | २६० |
| ४. | नवी - मुंबई मनपा | १४८ |
| ५. | उल्हासनगर मनपा | ७४ |
| ६. | अंबरनाथ - बदलापूर नपा (मजीप्रा) | ७४ |
| ७. | मऔवि महामंडळ (म्हाडाच्या प्रधानमंत्री आवास योजनेसह) | ३०० |
| ८. | स्टेम प्राधिकरण | ७६ |
| | एकूण | १२०४ |

उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे म.औ.वि. महामंडळासाठी पाणी वाटपाच्या समन्यायी तत्वावर ३०० उमेदवारांच्या पदसंख्येऐवजी २४२ उमेदवारांची यादी जिल्हाधिकारी, ठाणे यांनी म.औ.वि. महामंडळास सादर केली. सदर उमेदवारांपैकी २०९ ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले. त्यानुसार म.औ.वि. महामंडळाने नगर विकास विभाग, शासन निर्णय, दि. १८/०९/२०१७ मधील अ.क्र. २ व ३ मधील तदतुदीनुसार २०९ बारवी धरण प्रकल्पबाधीतांना सरसकट अधिसंख्य या पदावर नियुक्ती दिली. तद्नंतर प्रकल्पग्रस्त ५% व भुकंपग्रस्त

२% आरक्षण असे एकूण ७% आरक्षणाच्या मर्यादेत रिक्त असलेल्या पदांवर ७५ बारवी प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांना कायम आस्थापनेवर दि. ०२/१२/२०२४ रोजीच्या आदेशानुसार सामावून घेण्यात आले व उर्वरित आरक्षणाच्या मर्यादेत पदे रिक्त नसल्याने "गट क" व "गट ड" मधील एकूण १३४ बारवी प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांना नेमणूकीच्या दिनांकापासून अधिसंख्य पदावर नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर अधिसंख्य पदावरील कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यास अथवा कोणत्याही कारणास्तव सेवा देण्यास सक्षम न ठरल्यास (मृत्यू, बडतर्फी, सेवा सोडून जाणे इ.) सदर पद आपोआप व्यपगत होणार आहे. तसेच सदर कर्मचाऱ्यांना पदोन्नती व पदबदल लागू करण्यात आलेले नाही.

उर्वरित पात्र प्रकल्पबाधितांपैकी नोकरी विषयक नकार देणाऱ्यांना रु. १० लक्ष इतके नोकरी अनुदान देण्यात आले आहे.

वित्त विभाग, शासन निर्णय, दि. ३१/१०/२०२२ नुसार ज्या विभाग/ कार्यालयांचा सुधारीत आकृतीबंध अंतिम झालेला नसल्यास "वर्ग क" मधील वाहनचालक व "वर्ग ड" मधील सर्व पदे भरता येणार नाहीत असा निर्णय दिलेला आहे. परंतु म.औ.वि. महामंडळामध्ये "वर्ग क" व "वर्ग ड" संवर्गांची शिपाई, मदतनीस व वाहनचालकांची बरीचशी पदे रिक्त असल्यामुळे सद्यस्थितीत म.औ.वि. महामंडळामध्ये बारवी धरण टप्पा क्र. ३ मधील अधिसंख्य पदावर कार्यरत असलेल्या १३१ बारवी प्रकल्पबाधितांना नियमित आस्थापनेवर नेमणूक करण्याकरीता प्रोत्साहनपर निर्णय घेण्यासाठी म.औ.वि. महामंडळाने शासनास सादर केलेला प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे मार्गदर्शनार्थ सादर केला आहे. सामान्य प्रशासन विभागाकडून अभिप्राय प्राप्त होताच याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

************************

# महाराष्ट्र विधानसभा

## सन- २०२६ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

### लक्षवेधी सूचना क्र. २४८५

श्री. हिरामण खोसकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२४८५ पुढीलप्रमाणे आहे:-

" इगतपुरी-त्र्यंबकेश्वर मतदार संघात इगतपुरी तालुक्यात अनेक महत्वपूर्ण व मोठमोठ्या औद्योगिक वसाहती असून सदरच्या कंपन्यांमध्ये दररोज कोट्यवधी रुपयांचे स्क्रॅप मटेरियल निघणे,परंतु सदर स्क्रॅप मटेरियलचे ऑडिट होत नसल्याने शासनाचा कोटयवधींचा महसूल बुडणे, या स्क्रॅप मटेरियलकरिता निविदा काढणे आवश्यक असतानाही निविदा न काढता हे स्क्रॅप मटेरियल विकण्यात येत असणे, यासंदर्भात शासनाकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार तक्रार करणे तसेच दिनांक २७ जानेवारी, २०२६ रोजीच्या सुमारास मा.उद्योग मंत्री यांना लेखी निवेदनही देण्यात येणे, परंतु अद्यापही यावर कोणतीच कार्यवाही होत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, शासनाचा कोट्यवधींचा महसूल बुडत असल्याने या स्क्रॅप मटेरियलकरिता निविदा काढण्याबाबत तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया. "

#### मा.मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

इगतपुरी व त्र्यंबकेश्वर मतदार संघ क्षेत्रातील इगतपुरी तालुक्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे औद्योगिक क्षेत्र विकसित केलेले नाही. या क्षेत्रातील औद्योगिक कंपन्यांमधील निघणाऱ्या स्क्रॅप संदर्भात संबंधित कंपन्यांकडून कार्यवाही केली जाते, हा खाजगी व्यवसाय असल्यामुळे त्यावर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ किंवा शासन स्तरावरुन प्रत्यक्ष नियंत्रण होत नाही. खाजगी कंपन्यांनी स्क्रॅप विक्रीसंदर्भात कार्यवाही करताना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ किंवा अन्य यंत्रणांच्या परवानगीचा प्रश्न येत नाही.

सदर लक्षवेधी सूचनेत उपस्थित मुद्दे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाशी संबंधित नाहीत. तसेच प्रस्तुत लक्षवेधी सूचनेत नमूद दि.२७ जानेवारी, २०२६ रोजीचे निवेदन म.औ.वि. महामंडळ तथा उद्योग संचालनालयास प्राप्त झालेले नाही.

-x-x-x-x-x-x-x-x-x-

२८२.
-५/७३९

महाराष्ट्र विधानपरिषद

सन २०२६ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. शिवाजी शट्टप्पा पाटील, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. २५३४ पुढीलप्रमाणे आहे –

"चंदगड, गडहिंग्लज व आजरा तालुक्यांतील अनेक गावांमध्ये मोबाईल नेटवर्कची सुविधा नसल्याने येथील नागरिकांना अनेक समस्यांना तोंड दयावे लागणे, त्यामुळे नागरिकांना संपर्क करणे कठीण होणे, तालुक्यात नैसर्गिक आपत्ती अथवा दुर्घटना घडल्यास संपर्कच होत नसणे, संदेशवहन होत नसल्याने वैदयकीय व इतर सुविधाही या गावांना देणे अवघड होणे यापेक्षा पावसाळयात परिस्थिती बिकट असणे, याबाबत राज्य शासनाने लक्ष घालून तात्काळ निर्णय घेऊन चंदगड, गडहिंग्लज व आजरा तालुक्यांतील गावांमध्ये मोबाईल नेटवर्क सुविधा उपलबध करुन देण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका ."

---

मा. मंत्री ( माहिती तंत्रज्ञान ) यांचे निवेदन

दुरसंचार महासंचलनालय, नवी दिल्ली यांच्या चंदगड, गडहिंग्लज व आजरा तालुक्यांतील गावनिहाय यादीप्रमाणे संबधित तालुक्यांमध्ये सुमारे ३५० गावे आहेत. दि.२८/०२/२०२६ पर्यंत दुरसंचार प्रदात्यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मोबाईल सेवांची सद्यस्थिती पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तालुक्याचे नाव | जिल्हा | DGT च्या यादीप्रमाणे एकुण गावे | 4G सुविधा असलेली गावे | 4G सुविधा नसलेली गावे |
|---|---|---|---|---|---|
| १. | आजरा | कोल्हापुर | १०० | ९८ | ०२ |
| २. | चंदगड | कोल्हापुर | १५६ | १५२ | ०४ |
| ३. | गडहिंग्लज | कोल्हापुर | ९४ | ९४ | ०० |
| एकुण | | | | | ०६ |

४G सुविधा नसलेल्या गावांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:

| अ.क्र. | तालुका | गावाचे नाव | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १. | आजरा | वझरे | **सर्व ६ गावांची डिजिटल भारत निधी (DBN) अंतर्गत (USOF), दूरसंचार विभाग, नवी दिल्ली यांच्याकडे योग्य योजनेंतर्गत समाविष्ट करण्यासाठी शिफारस करण्यात आलेली आहे.** |
| २. | आजरा | परपोली | |
| ३. | चंदगड | खालसा म्हाळुंगे | |
| ४. | चंदगड | ईसापूर | |
| ५. | चंदगड | मिरवेल | |
| ६. | चंदगड | वाघोत्रे | |

ग्रामीण महाराष्ट्रात **4G** मोबाईल सेवा उपलब्ध करून देण्यासाठी भारत सरकारकडून डिजिटल भारत निधी (DBN) अंतर्गत विविध योजना राबविण्यात येत आहेत. कोल्हापूर जिल्ह्यात BSNL मार्फत राबविण्यात येत असलेल्या **4G** संतृप्ती योजनेअंतर्गत (Saturation Scheme) एकूण ५० ठिकाणांचे नियोजन करण्यात आले असून त्यापैकी दि.०५.०३.२०२६ पर्यंत ४६ ठिकाणे कार्यान्वित करण्यात आलेली आहेत. उर्वरित ४ ठिकाणांवर काम प्रगतीपथावर आहे.

**************

महाराष्ट्र विधानसभा सन २०२६ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

लक्षवेधी सुचना क्र.२९४०

मा.श्री. सुरेश धस, वि.स.स. यांनी म.वि.स. नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.२९४० खालील प्रमाणे आहे. :-

"राज्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या (FPCs) बळकटीकरणासाठी कृषी विभागामार्फत वितरित करण्यात आलेल्या निधीमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याची धक्कादायक बाब मार्च २०२६ च्या पहिल्या आठवड्यात समोर आली असणे, प्राप्त माहितीनुसार एकूण २८ कोटी रुपयांच्या निधीपैकी तब्बल २१ कंपन्यांना २० कोटी रुपयांहून अधिकची अग्रीम (Advance) रक्कम प्रत्यक्ष काम सुरू होण्यापूर्वीच नियमबाह्यरीत्या प्रदान करण्यात आली असणे, सदर प्रक्रियेत शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्त्वांचे आणि वित्तीय नियमांचे उघडपणे उल्लंघन झाले असणे, कोट्यवधीचा निधी वितरित होऊनही या कंपन्यांच्या हिश्शाचे प्रत्यक्ष काम जमिनीवर अत्यंत अत्यल्प किंवा नगण्य स्वरूपात असणे, या गंभीर प्रकरणाबाबत खुद्द कृषी विभाग अनभिज्ञ असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाल्याने प्रशासकीय अनागोंदी चव्हाट्यावर आली असणे, एका बाजूला निधीचा अभाव असल्याचे सांगितले जात असताना दुसऱ्या बाजूला ठराविक कंपन्यांना नियमबाह्य लाभ देऊन शासनाच्या तिजोरीवर दरोडा टाकण्याचा हा प्रकार असणे, यामुळे पात्र व गरजू शेतकरी कंपन्या संधीपासून वंचित राहिल्याने राज्यातील शेतकरी वर्गामध्ये तीव्र संतापाची भावना पसरली असणे, या प्रकरणी तातडीने चौकशी करून दोषी अधिकारी व संबंधित कंपन्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची आणि भविष्यात असा गैरव्यवहार टाळण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया"

---

मा.मंत्री (कृषी) यांचे निवेदन

जिल्हा विकास आराखडा (District Strategic Plan) अंतर्गत जिल्हा वार्षिक योजनेतून सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात कृषी विभागामार्फत एकूण २१ शेतकरी उत्पादक कंपन्यांचे (FPCs) सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करण्यात आले होते. सदर २१ शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या एकूण रू. २७८२.७४ लक्ष रकमेच्या प्रस्तावांना जिल्हाधिकारी, नंदुरबार यांच्या स्तरावरून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. त्यास अनुसरून, पात्र ठरलेल्या २१ शेतकरी उत्पादक कंपन्यांना एकूण रू.१९७१.८९ लक्ष इतका निधी दोन टप्प्यांत वितरित करण्यात आलेला आहे.

आयुक्त (कृषी) यांच्या दि.०५/०६/२०२३ च्या परिपत्रकान्वये कृषी विभागाच्या जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांना तांत्रिक मंजुरी देण्याबाबत वित्तीय मर्यादा निश्चित करण्यात आल्या आहेत. सदर परिपत्रकातील निकषांनुसार, रू. १५ लाखांपर्यंतच्या प्रस्तावांना तांत्रिक मंजुरी देण्याचे अधिकार जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना, रू. २५ लाखांपर्यंतच्या प्रस्तावांना विभागीय कृषी सहसंचालक यांना, तर रू. २५ लाखांपेक्षा जास्त रकमेच्या प्रस्तावांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार कृषी संचालक (संबंधित योजना), कृषी आयुक्तालय, पुणे यांना आहेत. तथापि, तत्कालीन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नंदुरबार यांनी आयुक्त (कृषी) यांच्या परिपत्रकानुसार न करता जिल्हा स्तरावर समिती स्थापन करून सदर प्रस्तावांना परस्पर तांत्रिक मान्यता प्रदान केल्याचे निदर्शनास आले आहे.

प्रस्तुत प्रकरणी दक्षता पथकाकडून प्राप्त अहवाल आणि जिल्हाधिकारी नंदुरबार यांच्या

दि.०६/०४/२०२६ च्या पत्रानुसार श्री. चेतन कुमार ठाकरे (तत्कालीन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नंदुरबार) हे अनियमिततेसाठी जबाबदार असल्याचे निदर्शनास आले. या अनुषंगाने, शासन आदेश दि. २६/०५/२०२६ अन्वये तत्कालीन प्रभारी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. चेतन कुमार ठाकरे यांना निलंबित करण्यात आले आहे.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नंदुरबार कार्यालयाच्या दि. २४/०३/२०२६ च्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या प्राथमिक चौकशी अहवालानुसार, ज्या शेतकरी उत्पादक संस्थांना अनुदान निधी वितरित करण्यात आला होता, त्यांची प्रकल्पपूर्व मोका तपासणी/प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात आली नव्हती. तसेच, वितरित शासकीय निधीचा विनियोग प्रत्यक्ष प्रकल्प उभारणीसाठीच केला गेला आहे किंवा कसे, याची कोणतीही पडताळणी झाली नसल्याचे आणि सदर बहुतांश प्रकल्प अद्यापही अपूर्ण अवस्थेत असल्याचे अहवालात नमूद आहे. सदर गंभीर बाबींची तात्काळ दखल घेऊन, कृषी आयुक्तालयाच्या दि. २०/०५/२०२६ च्या पत्रान्वये विभागीय कृषी सहसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांना सर्व प्रकल्पांची प्रत्यक्ष मोका तपासणी व सखोल स्थळ पाहणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सदर तपासणीत शासकीय निधीचा गैरवापर झाल्याचे निष्पन्न झाल्यास, संबंधित जबाबदार असणाऱ्यांविरोधात तातडीने कडक फौजदारी कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

********

**लक्षवेधी सूचना क्र. २९५६**

**महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात श्री. राहुल पाटील, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. २९५६ खालीलप्रमाणे**

"राज्यातील आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यातील शेतक-यांना धान्यपुरवठा बंद करुन अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात येणे, तथापि गेल्या वर्षभरापासून शेतक-यांना सदर अनुदानाची रक्कम मिळालेली नसणे, तसेच कृषी विभागांतर्गत राबविण्यात येणा-या कृषी यांत्रिकीकरण योजना, प्रधानमंत्री सूक्ष्म सिंचन योजना, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना, व पिक विमा योजनाअंतर्गत राज्यातील शेतक-यांची गेल्या ५ वर्षाची सुमारे १२ हजार कोटी रुपयांची रक्कम थकीत असणे, शेतक-यांना विविध योजनेंतर्गत अनुदानाची रक्कम वेळेवर न मिळाल्याने कर्जफेड करणे, शेती व्यवस्थापन यामध्ये अनेक अडचणीला शेतक-यांना सामोरे जावे लागणे, परिणामी शेतक-यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, कृषी विभागांतर्गत विविध योजनेंतर्गत शेतक-यांची थकीत अनुदानाची रक्कम त्वरीत वितरित करण्याची आवश्यकता. याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

**निवेदन**

राज्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, नांदेड, बीड, उस्मानाबाद, परभणी, लातूर, हिंगोली, अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा या १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या एपिएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकरी लाभार्थ्यांना माहे जानेवारी, २०२३ पासून अन्नधान्याऐवजी प्रतिमाह प्रति लाभार्थी ₹१५०/- इतक्या रोख रकमेच्या थेट हस्तांतरणाची योजना दि.२८.०२.२०२३ च्या शासन निर्णयान्वये सुरु केली आहे. तथापि, दि.२०.०६.२०२४ अन्वये शासन परिपत्रकान्वये माहे एप्रिल, २०२४ पासून प्रतिमाह प्रति लाभार्थी ₹१७०/-इतक्या रोख रकमेचे वितरण करण्याच्या सूचना दिल्या आहेत.सदर योजनेकरिता सन २०२५-२६ या आर्थिक करिता रु. ९०.०० कोटी निधी अर्थसंकल्पित केला होता. त्यापैकी रु. ४४.५० कोटी दि. ०४.०९.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये वितरित केले आहेत. तर, पुरवणी मागणीद्वारे रु. १००.०० कोटी मंजूर केले असून मूळ अर्थसंकल्पिय तरतूदीमधील शिल्लक रु. ४५.५० कोटी व पुरवणी मागणीचे रु. १००.०० कोटी असा एकूण रु. १४५.५० कोटी निधी दि. १८.०३.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर योजनेसाठी जिल्ह्यांना वितरित केला आहे.

२. कृषी विभागामार्फत कृषि यांत्रिकीकरण उपअभियान, राज्य पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण व राष्ट्रीय कृषि विकास योजना (विस्तृत प्रकल्प अहवाल) कृषि यांत्रिकीकरण प्रकल्प या योजना महाडीबीटी पोर्टलद्वारे राबविल्या जात आहेत. सदर योजनांतर्गत सन २०२५-२६ मध्ये ६,७७,७२७ लाभार्थ्यांचे अर्ज प्रक्रियेमध्ये आहेत. सदर योजनांतर्गत ४,२९,३८१ लाभार्थ्यांना पूर्वसंमती प्रदान केली असून देयके अपलोड केलेल्या लाभार्थ्यांच्या बाबतीत मोका तपासणी करून अनुदान अदायगीची कार्यवाही चालू आहे. सन २०२५-२६ मधील सदर योजनांचा खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**(रु. कोटी)**

| अ. क्र. | योजना | मंजूर आराखडा | प्राप्त निधी | खर्च निधी |
|---|---|---|---|---|
| १ | कृषी यांत्रिकीकरण उपअभियान | २०४.१४ | २०४.१५ | २०४.१० |
| २ | राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण | ७००.०० | ७००.०० | ७००.०० |
| ३ | राकृवियो- कृषी यांत्रिकीकरण प्रकल्प | २०५.१२ | १९०.३१ | १५९.५७ |
| | **एकूण** | **११०९.२६** | **१०९४.४६** | **१०६३.६७** |

३९२



प्रलंबित लाभार्थ्यांसाठी राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत पुनर्विनियोजनाद्वारे निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. कृषी यांत्रिकीकरण उपअभियान अंतर्गत सन २०२६-२७ करिता रु. ५००.०० कोटींचा वार्षिक कृती आराखडा केंद्र शासनास सादर केला आहे.

३. प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना-प्रति थेंब अधिक पिक (सूक्ष्म सिंचन) योजनेंतर्गत खर्च व लाभार्थी संख्या खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | खर्च अनुदान (रु.कोटीत) | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | २०२४-२५ | ७२७.३७ | २,०१,२९९ |
| २ | २०२५-२६ | ५१०.१७ | १,३३,६३३ |

सन २०२५-२६ मध्ये एकूण रु.५६२.४६ कोटी निधी प्राप्त झालेला असून, रु.५१०.१७ कोटी (सर्वसाधारण प्रवर्ग-रु.४६९.२७ कोटी,अनुसूचित जाती-रु.२०.२५ कोटी, अनुसूचित जमाती-रु.२०.६५ कोटी) निधी १,३३,६३३ लाभार्थ्यांना वाटप करण्यात आलेला असून १,२६,९५१.३५ हे. क्षेत्र सिंचनाखाली आले आहे.

४. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना शासन निर्णय क्र. फुफला २०२५/प्र.क्र.१३७/९-ए, दिनांक १८ जुलै, २०२५ अन्वये सन २०२५ २६ करीता राबविण्यासाठी प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. योजनेंतर्गत वर्षनिहाय झालेला खर्च व लाभार्थी खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वर्ष | खर्च रक्कम (कोटी) | लाभार्थी संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २०२१-२२ | ३८.०० | - | कोविड १९ या महामारीच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या बचतीच्या धोरणामुळे सन २०२०-२१ व २०२१-२२ या वर्षासाठी नवीन लक्षांक देण्यात आलेला नाही. फक्त सन २०१८-१९ व २०१९-२० मधील लागवडीच्या द्वितीय व तृतीय वर्षासाठीचे दायित्व भागविण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला होता. |
| २ | २०२२-२३ | ०.०० | - | |
| ३ | २०२३-२४ | ६७.९३ | १५७१५ | |
| ४ | २०२४-२५ | १२५.८८ | २७२९२ | |
| ५ | २०२५-२६ | ७२.९० | ११२२३ | |

भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजनेंतर्गत सन २०२५-२६ साठी रु. १०४.५० कोटींची तरतूद केली आहे. आज अखेर रु. ७४.५० कोटी निधी प्राप्त झाला असून रु. ६२.५० कोटी संपूर्ण निधी जिल्हास्तरावरुन प्राप्त मागणीच्या प्रमाणात जिल्हानिहाय वितरीत केला आहे. वितरीत निधी १००% खर्च झाला आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता मंजूर आर्थिक तरतुदीच्या अधिन राहून उर्वरीत रक्कम रू. ४२.९७ कोटी पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

५. पिक विमा योजना अंतर्गत मागील पाच वर्षात (सन २०२०-२१ ते सन २०२४-२५) शेतकऱ्यांना रु.२२७८६.४६ कोटी नुकसान भरपाई मंजूर झाली आहे. त्यापैकी रु.२२५१४.५१ कोटी (९९ टक्के) वाटप झालेले आहे. सन २०२० मधील प्रलंबित न्यायालयीन प्रकरणातील रु.२२५ कोटी नुकसान भरपाईचे वाटप न्यायप्रविष्ठ आहे, तसेच, शेतकऱ्यांचे चुकीचे व आधार असंलग्न बँक खाते तसेच रु.१००० पेक्षा कमी नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही प्रगतीत आहे.

---

# महाराष्ट्र विधानसभा

## महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. ६०१

## सन २०२६ चे पहिले अर्थसंकल्पिय अधिवेशन

मा.श्री.राजेश वानखडे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.६०१ पुढीलप्रमाणे आहे :-

"अमरावती जिल्ह्यातील तिवसा विधानसभा मतदार संघातील जास्त लोकसंख्या असलेले व मोठ्या संख्येने लगतची लहान गावातील नागरिक आरोग्य सुविधेकरीता अवलंबून असलेले माहुली जहागीर, वलगाव, ता.अमरावती, नेर पिंगळाई ता.मोर्शी, कुऱ्हा ता. तिवसा व खोलापूर ता. भातकुली या प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये रुग्ण संख्या जास्त आरोग्य सेवा अपुरी पडणे, त्यामुळे नागरिकांना नाईलाजाने उपचारा करिता तालुक्याच्या ठिकाणी जावे लागणे, तेथे चांगल्या दर्जाच्या आरोग्य सुविधा पुरवण्या करिता या आरोग्य केंद्रांचे ग्रामीण रुग्णालयामध्ये श्रेणी वर्धन करण्याबाब सातत्याने नागरिकांद्वारे मागणी असणे,सदर आरोग्य केंद्रांचे श्रेणीवर्धन करण्याबाबत माझ्या द्वारे मागणी पत्राद्वारे मा. आरोग्य मंत्री याचं इकडे करणे, सदर प्रस्ताव उपसंचालक कार्यालय अकोला द्वारे शासनास अनेक महिन्यासून सादर करण्यात आलेले असणे, अद्यापही यावर मान्यतेची कारवाई न होणे, यामुळे रुग्णांना अनावश्यक त्रास होऊन जनतेमध्ये शासनाप्रति रोष निर्माण होणे, या प्राथमिक आरोग्य केंद्रांचे ग्रामीण रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याची तातडीची गरज, यावर शासनाने करावयची उपाययोजना व कारवाई ? "

---

### मा.श्री. प्रकाश अबिटकर, मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण) यांचे निवेदन :-

प्राथमिक आरोग्य केंद्र, माहुली जहागीर, ता. जि. अमरावती आणि प्राथमिक आरोग्य केंद्र, नेर पिंगळाई, ता. मोर्शी, जि. अमरावती यांचे ग्रामीण रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबत प्रस्ताव अनुक्रमे दि.३०.०६.२०२५ आणि दि. ०८.१०.२०२५ अन्वये शासनास प्राप्त झाले आहेत.

प्राथमिक आरोग्य केंद्र, वलगांव, ता. जि. अमरावती आणि प्राथमिक आरोग्य केंद्र, खोलापूर, ता. जि. अमरावती चे ग्रामीण रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबतचा प्रस्ताव क्षेत्रीय स्तरावर तपासणीधीन आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र, कुऱ्हा, ता. तिवसा, जि. अमरावती चे ग्रामीण रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबतचा प्रस्ताव विहित निकषात बसत नसल्यामुळे शासन पत्र, दि. २०/११/२०२३ अन्वये शासनस्तरावरुन अमान्य करण्यात आला आहे.

उक्त वस्तु:स्थिती असली तरी, सार्वजनिक आरोग्य सेवेच्या पायाभुत सुविधांबाबत नियोजित पध्दतीने कामे करण्याची आवश्यकता विचारात घेऊन शासनाने दिनांक २९/०५/२०२५ अन्वये असा धोरणात्मक निर्णय घेतला आहे की, आधीच हाती घेण्यात आलेली बांधकामे पूर्ण करुन त्या-त्या ठिकाणी रुग्णांसाठी आरोग्य सेवा तातडीने उपलब्ध करुन देण्यात याव्या. चालू बांधकामे पूर्ण झाल्यानंतर आवश्यकतेनुसार रुग्णालयाची नवीन बांधकामे/ श्रेणीवर्धन करण्याचे प्रस्ताव विचारात घ्यावेत.

***********

विधानसभा सूचना क्र. २०८९

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२६ चे (पावसाळी) अधिवेशन

श्री. रोहित पवार, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २०८९ पुढील प्रमाणे आहे.

"माहे डिसेंबर २०२५ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील श्रीपतपिंपरी येथे माहेरी आलेल्या वृशाली वैभव मोरे या गरोदर महिलेची बेकायदेशीरपणे सोनोग्राफी केली असणे व त्यानंतर तिला गभ्रपाताच्या गोळया देण्यात येणे, व गर्भपातामुळे अतिरक्स्राव झाल्याने तिचा मृत्यू होणे,सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील जामगाव (आ.) शिवारातील वाणेवाडी गावात अवैध गर्भलिंग निदान करुन फिरते गर्भपात केंद्र चालवले जात असणे, बार्शी ग्रामीण पोलीसांनी कारवाई केली असता तिथे सुमारे १८ लाख रुपयांचा मुद्देमाल ,पोर्टेबल सोनोग्राफी मशीन आणि गर्भपाताचे किट जप्त करण्यात आले असणे, या रॅकेटने आतापर्यंत ५० हून अधिक बेकायदा गर्भपात केले असून प्रत्येक केससाठी ४० हजार रुपये आकारले असणे, तसेच राज्यातील कोल्हापूर , जालना,नागपूर,अहिल्यानगर जिल्ह्यात देखील अवैध गर्भलिंग निदान चालवले जात असून,अवैधरित्या गर्भपात करणे, महिलांच्या आरोग्याची हेळसांड होत असणे, परिणामी राज्यातील मुलींच्या जन्मदरात घट होत असणे, अवैध गर्भलिंग निदान रॅकेट चालविणा-यांवर व गर्भलिंग निदान कायद्याच्या अमलबजावणीबाबत शासनाने तत्काळ करावायाची कारवाई आणि अवैध गर्भपात रॅकेट रोखण्यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना"

---

**मा. श्री. प्रकाश आबिटकर, मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे निवेदन**

डिसेंबर २०२५ मध्ये वृषाली वैभव मोरे हिने पंढरपूर येथे आरोपींच्या मदतीने बेकायदेशीर गर्भलिंग निदान करून घेतल्याचे निष्पन्न झाले. गर्भ मुलगी असल्याची माहिती मिळाल्यानंतर तिला गर्भपातासाठी औषधे देण्यात आली. १४ डिसेंबर २०२५ रोजी तिला बार्शी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले असता, असुरक्षित दुसऱ्या तिमाहीतील गर्भपातामुळे (Hemorrhagic Shock) तिचा मृत्यू झाला. या प्रकरणी बार्शी पोलीस ठाणे येथे गु.र .नं ०३९५/२०२५ अन्वये गुन्हा

दाखल करण्यात येऊन १२ आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास पोलीसांमार्फत सुरू आहे.

तसेच ७ जानेवारी २०२६ रोजी जामगाव ता.बार्शी येथे आरोग्य व पोलीस विभागाने संयुक्त कारवाई करून बेकायदेशीर सोनोग्राफी मशीन, गर्भपातासाठी वापरण्यात येणारी औषधे व साहित्य व वाहन जप्त केले. या प्रकरणी बार्शी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ०८/०६ अन्वये गुन्हा दाखल करून आठ आरोपींना अटक करण्यात आली असून प्रकरण मा.प्रथम न्याय दंडाधिकारी न्यायालय बार्शी येथे Cri.M.A.46/2026 अन्वये न्यायप्रविष्ट आहे.

राज्यात कोल्हापूर, जालना व नागपूर येथेही अशा घटना आढळून आल्या असून संबंधितांविरुद्ध न्यायालयीन कारवाई सुरू आहे. अहिल्यानगर येथे सध्या अशी घटना आढळून आलेली नाही.

नागरी नोंदीणी प्रणाली च्या अहवालानुसार महाराष्ट्र राज्याचे जन्मत: लिंग गुणात्तर प्रमाणात सन २०२३ च्या तलुनेत सन २०२४ मध्ये ५ अंकाने वाढ होवून ९१२ इतके झाले आहे.

मुलींच्या जन्मदरात वाढ व्हावी यासाठी गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंधक) कायदा, १९९४ (सुधारित २००३) ची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. सर्व नोंदणीकृत सोनोग्राफी केंद्रांची नियमित तपासणी, स्टिंग ऑपरेशन्स (डिकोय केस), तसेच उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येते. तक्रारी नोंदविण्यासाठी १८००/१०४ टोल-फ्री हेल्पलाईन व www.amchimulgi.com संकेतस्थळ उपलब्ध आहे. या माध्यमातून प्राप्त तक्रारींची तपासणी करून दोषींवर कायदेशीर कारवाई केली जाते.

समाजामध्ये मुलींच्या जन्माबाबत सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी शासनामार्फत विविध प्रभावी प्रचार तसेच सामाजिक माध्यमांचा वापर करुन जनजागृती करण्यात येत आहे.

---